



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक २३६ * नांदेड * शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# चार प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही -जरांगे

## कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी सरकार तयार; अर्ज करण्याचे जरांगेंचे आवाहन



गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणासाठीच्या उपोषणस्थळी सरकारच्या शिष्टमंडळाने भेट दिली आहे. यानंतर राज्य सरकारच्या मंत्र्यांची मंत्रिमंडळाची शिष्टाई कामाला आली असून आजपासून (४ सप्टेंबर) कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचं आवाहन मराठा समाजाला करण्यात आलं आहे. त्यासाठी नातं, रक्ताचं नातं आणि कुळ या मुद्द्यांच्या आधारे ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत, त्यांना अर्ज करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**जालना (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली असून, रद्द झालेली चार प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही, असा इशारा सरकारला दिला. सध्या फक्त पाणी पिऊन आणि सलाईन लावून आंदोलन सुरू ठेवणार असून सरकारला ४ दिवसांची मुदत दिली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रसाद लाड साहेब खूप तळमळ करत आहेत, पण आपले आरक्षण फक्त 'श्रेयात' गुंतले आहे. त्यामुळे आपल्याला आता वेगळी आणि कठोर लढाई करावी लागेल, असे ते म्हणाले.

यावेळी जरांगे पाटील म्हणाले, आम्हाला ओबीसींचे १ टक्का आरक्षण नको आहे. ज्यांच्या नोंदी निघत आहेत, त्यांना प्रमाणपत्र मिळालेच पाहिजे आणि याला ओबीसींचा देखील विरोध नसला पाहिजे. जर हैद्राबाद गॅझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्र वाटप झाले तर आम्ही फुले उधळू. सातारा आणि कोल्हापूर गॅझेटियरनुसार सरकारने तात्काळ जीआर काढावा आणि त्याची अंमलबजावणी ३ महिन्यांनंतर करावी. चार रद्द झालेले प्रमाणपत्र दिल्याशिवाय उपोषण सोडणार नाही. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर टीका करताना जरांगे म्हणाले की, विखे पाटील कधीच खरे बोलत नाहीत, ते काहीतरी शाळा करत आहेत आणि शिंदे-फडणवीस यांच्यात भांडण लावत आहेत. आमचे त्यांच्याशी वैयक्तिक शत्रूत्व नाही, पण ते नेहमी खोटे बोलतात, असे ते म्हणाले.

हैदराबाद गॅझेटनुसार ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, त्यांना व्हॅलिडिटीसाठी अर्ज करण्याचं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे. ५ सप्टेंबरपर्यंत ग्रामपंचायतींमध्ये नोंदीची यादी लावण्यात येणार आहे. कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी नोडल अधिकारी नेमण्यात येणार असून त्यामध्ये काही अडचणी आल्या तर जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचं आवाहन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं.

मराठा समाज्याच्या ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, त्यांना व्हॅलिडिटी देण्यासोबत इतर मागण्यांसाठी मनोज जरांगे हे गेल्या सहा दिवसांपासून जालन्यातील अंतरवाली सराटीमध्ये आंदोलनासाठी बसले आहेत. (पान ६ वर...)

# जून ते ऑगस्ट दरम्यान राज्यात पावसाची तूट १४.७ टक्क्यांवर

## १५ जिल्ह्यांत ७५ टक्क्यांपेक्षा कमी पावसाची नोंद, विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा समावेश



**मुंबई (प्रतिनिधी)–** सध्या राज्यात पावसानं दडी मारल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. यामुळं शेती पिकांना मोठा फटका बसत आहे. शेतकरी पावसाची मोठ्या आशेनं वाट पाहत आहेत. दरम्यान, जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांत राज्यात पावसाची १४.७ टक्के तूट आहे. तर १५ जिल्ह्यांत ७५ टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस झाला आहे. मराठवाड्यासह विदर्भा पश्चिम महाराष्ट्रात पिके करपू लागली आहेत. अनेक ठिकाणी पावसाचा मोठा खंड आहे.

राज्यात १ जून ते ३१ ऑगस्टदरम्यान अपेक्षित सरासरी पावसाच्या तुलनेत तब्बल १४.७ टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे पावसावर अवलंबून असलेल्या खरीप पिकांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. पावसाळा सुरु होऊन तीन महिन्यांचा कालावधी लोटला आहे. तरीदेखील राज्यात समाधानकारख पाऊस पडलेला नाही. त्यामुळं शेतकऱ्यांची खरीपाची पिकं वायाच चालली आहेत. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा देखील मोठी प्रश्न निर्माण झाला आहे. त्याचबरोबर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागात सरासरी ७९३.९ मिमी पाऊस अपेक्षित असताना प्रत्यक्षात ३८२.९ मिमी पाऊस झाला आहे. पावसाचा मोठा खंड पडल्याने अनेक भागांमध्ये खरीप पिकांवर पाण्याचा ताण निर्माण झाला आहे. आठवडाभर पाऊस न झाल्यास काही भागातील पिके वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

पालघर, ठाणे आणि पुणे जिल्ह्यांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. तर रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहिल्यानगर, नाशिक, धुळे, जळगाव, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, हिंगोली, बुलढाणा, यवतमाळ, गोंदिया आणि गडचिरोली येथे सरासरीच्या आसपास पाऊस नोंदवण्यात आला आहे.

# होमगार्ड युवकाची गळफास घेऊन आत्महत्या



**किनवट (प्रतिनिधी)–** पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या एका २३ वर्षीय गृहरक्षक दलाच्या जवानाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गोकुंद्यात गुरुवारी दि.३ रोजी पहाटे उघडकीस आली.

किनवट तालुक्याच्या सावरगाव तांडा येथील रहिवाशी असलेला गणेश मदन चौफाडे हा गृहरक्षक दलात जवान म्हणून काम करीत असे. पोलीस भरतीची तयारी व शिक्षणासाठी तो गोकुंदा येथील अशोक राठोड यांच्या घरात भाड्याने खोली घेवून राहात होता.बुधवारी रात्री ते गुरुवारी पहाटेच्या सुमारास गणेश चौफाडे याने राहात्या खोलीतच गळफास घेऊन आत्महत्या केली.सकाळी ही बाब उघड झाली.याप्रकरणी किनवट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. युवकाच्या आत्महत्येचे कारण कळू शकले नाही.

# नागपुरात डॉल्बी साऊंड सिस्टिमवर बंदी

**नागपूर (प्रतिनिधी)–** आगामी सण आणि उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नागपूर शहर पोलिसांनी ध्वनी प्रदूषणाविरोधात एक अत्यंत मोठा आणि कडक निर्णय घेतला आहे. मिरवणुकीत वापरल्या जाणाऱ्या डीजे आणि डॉल्बी साऊंड सिस्टीमवर नागपुरात पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी याबाबतची अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. ही बंदी ३ सप्टेंबर मध्यरात्री १२ वाजेपासून ते १ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. यामुळे आगामी सणांमध्ये डीजेच्या दणदणाटाला आळा बसणार आहे.

एकीकडे पुण्यात डीजे बंदीवरून गोंधळ सुरू असताना नागपुरात मात्र त्यावर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे नागपुरातील यंदाच्या गणेशोत्सवात डीजेच्या दणदणाटाला आळा बसणार आहे.

अधिसूचनेत नमूद केल्यानुसार, सण-उत्सवांच्या काळात टॉप, मिड आणि बेस अशी मल्टीस्पीकर सिस्टीम, प्लाझ्मा साऊंड सिस्टीम आणि प्रेशरमिड साऊंड सिस्टीमचे एकावर एक थरावर थर चढवून वाहनांवर एखाद्या भिंतीसारखी रचना उभारली जाते. यासाठी वाहनांच्या मूळ रचनेत बेकायदेशीर बदल केले जातात.

अशा प्रकारे डीजेचा थरांवर थर लावून साऊंड सिस्टीम वापरताना मंडळाचे पदाधिकारी, विविध राजकीय पक्ष, संघटनांचे नेते, कार्यकर्ते आणि पोलीस प्रशासन यांच्यात तणाव निर्माण होण्याची मोठी शक्यता असते. तसेच यामुळे ध्वनी मर्यादेचे तीव्र उल्लंघन होते आणि कायदा-सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे अशी मल्टी-लेयर साऊंड सिस्टीम वापरण्यासाठी आणलेली वाहने किंवा रचनेत बदल केलेली वाहने जिथे आढळतील, तिथेच ती सीलबंद करण्याचे कडक निर्देश देण्यात आले आहेत.

# विद्यानंद बापट यांच्यावर हल्ला

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यातील गणेशोत्सवामधील डीजेच्या वापराविरोधात आवाज उठवणारे विद्यानंद बापट यांच्यावर हल्ला झाला. माध्यमांशी संवाद साधत असताना, टिळक रोड परिसरात एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्यावर हल्ला केला. विद्यानंद बापट पुणेकरांच्या विरोधात भूमिका घेतात, असा आरोप करत हल्लेखोराने हे कृत्य केल्याचे समोर आले आहे.

या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. याबबात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारताच त्यांनी स्पष्ट भुमिका मांडली. प्रसंगाने त्यांनी गणेशोत्सवाच्या संदर्भात एक महत्त्वाचा संदेश दिला. गणेशोत्सव ही आपली संस्कृती आणि परंपरा आहे. याला कुठेही गालबोट न लागता ती जपली पाहिजे. नागरिकांना त्रास होईल किंवा त्यांची गैरसोय होईल असे कोणतेही काम कुणीही करू नये, अशी सरकारची आणि आपली भूमिका असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

# महाप्रसाद, भंडाऱ्यांमधील अन्नाची गुणवत्ता आता रडारवर; सणासाठी थेट 'स्थायी आदेश'

**मुंबई (प्रतिनिधी)–** सण-उत्सवांच्या काळात भाविक आणि नागरिकांना मिळणारा महाप्रसाद, लंगर अथवा भंडाऱ्यांमधील अन्नाची गुणवत्ता आता अन्न आणि औषध प्रशासनाच्या थेट रडारवर असणार आहे. अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सण-उत्सवांच्या काळात होणारी अन्नातील भेसळ रोखण्यासाठी 'स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फेस्टिव्हल्स' हा ऐतिहासिक आणि धर्मनिरपेक्ष निर्णय जाहीर केला आहे. या नियमानुसार, महाप्रसादाच्या ठिकाणांची प्रत्यक्ष तपासणी केली जाईल. भारताच्या इतिहासात सर्व धर्मीयांच्या सणांसाठी वर्षभराचा असा स्थायी आदेश काढण्याची ही पहिलीच वेळ आहे.

सणांच्या काळात मिठाई, खवा, पनीर, तूप, सुकामेवा आणि मटण-चिकनची मागणी अनेक पटींनी वाढते; त्यामुळे भेसळीची शक्यताही दाट असते. हे रोखण्यासाठी एफडीएने वर्षभराचे कॅलेंडर तयार केले असून सर्व सणांचे तीन स्तरांत वर्गीकरण केले आहे.

ई-कॉमर्स, (पान ६ वर...)

# सकल मराठा समाजाच्यावतीने आज नांदेड जिल्हा बंदची हाक

## जरांगेंच्या उपोषणाला पाठिंबा; नांदेड जिल्ह्यात प्रमुख महामार्गावर रास्ता रोको, अनेक तालुक्यांत कडकडीत बंद



गुरूवारी सकल मराठा समाजाच्या वतीने नांदेड शहरातील राज कॉर्नर येथून मोटारसायकल रॅली काढण्यात आली. रॅलीत समाजबांधव सहभागी झाले होते. विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्री महोदयांना मराठा समाजाच्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.


**नांदेड (प्रतिनिधी)–** सकल मराठा समाज व विविध संघटनांच्या वतीने शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. सर्व समाजबांधव, व्यापारी आणि संघटनांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तत्पूर्वी दि. ३ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्हयात विविध ठिकाणी रास्ता रोको आंदोलन तसेच बंद पाळण्यात आले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी गुरुवारी नांदेड जिल्ह्यात मराठा समाज रस्त्यावर उतरला. सकल मराठा समाजाच्या वतीने प्रमुख महामार्गावर रास्ता रोको करण्यात आल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली.

नांदेड- नागपूर, नांदेड- हैदराबाद, नांदेड- बिदर आणि नांदेड- जालना या चारही प्रमुख महामार्गांवर ठिकठिकाणी आंदोलकांनी टायर जाळून, घोषणाबाजी करत रस्ता रोखला. त्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

गेल्या काही दिवसांपासून शासनाने मराठा समाजाच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे. याच पार्श्वभूमीवर गुरुवारी हदगाव, हिमायतनगर, लोहा आणि कंधार या चार तालुक्यांत कडकडीत बंद पाळण्यात आला. व्यापारी, व्यावसायिकांनी दुकाने बंद ठेवून पाठिंबा दिला. रास्ता रोको आणि बंद शांततेत सुरू होता. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

मराठा आरक्षण योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवली सराटी येथे आमरण उपोषण सुरु आहे. उपोषणाला पाठिंबा म्हणून व सकल मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी सकल मराठा समाजाने नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करुन शासनाने ओबीसी आरक्षणाचे आत्तापर्यंत काढलेल्या जीआरची सकल मराठा (पान ६ वर...)



# गावठी पिस्तूल विक्रीसाठी आलेला तरुण एलसीबीच्या जाळ्यात; ३६ हजारांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अवैध अग्निशस्त्रांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेने गावठी पिस्तूल व जिवंत काडतूस विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका आरोपीला ताब्यात घेतले आहे.

दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी एलसीबीचे पोउपनि साईनाथ पुयड व पथक अर्धापूर हद्दीत पेट्रोलिंग करत असताना भोकर फाटा परिसरात वसमत फाटा ब्रिजखाली एक इसम पिस्तूल विक्रीसाठी थांबल्याची गोपनीय माहिती मिळाली. पथकाने सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. त्याचे नाव अमोल रमेश गिर्हे (वय २२, रा. पांगरा गडघे, ता. जालना, ह.मु. सरपंच नगर, मालेगाव, ता. अर्धापूर) असे आहे.

पंचांसमक्ष झडतीत त्याच्याकडून सिल्वर रंगाचे गावठी पिस्तूल ३५ हजार रुपये व मॅगझिनमधील एक जिवंत काडतूस १ हजार रुपये असा एकूण ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत त्याने हे पिस्तूल नागेश गंगाधर हरबळे (रा. धामणगाव, ता. वसमत, जि. हिंगोली) याच्याकडून विक्रीसाठी आणल्याचे सांगितले. या प्रकरणी दोघांविरुद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४८५/२०२६, कलम ३/२५, ७/२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (पान ६ वर...)

# नांदेड शहरात ५४ वीज चोरांविरूध्द कारवाई; १२ जणांविरूध्द पोलिसांत गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहरात वाढत जाणारी विजेची वितरण व वाणिज्यक हाणी कमी करून ग्राहकांना अधिक सुरळित व अखंडित वीज पुरवठ्यासाठी महावितरणने वीज चोरांविरूध्द मोहिम हाती घेतली आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये महावितरणच्या कारवाईत नांदेड शहरात ५४ वीज चोरांविरूध्द कारवाई केली असून १२ जणांविरूध्द पोलिसात गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत.

मुख्य अभियंता राजाराम माने आणि अधिक्षक अभियंता संजय खंदारे यांच्या निर्देशानुसार नांदेड शहरातील शहर उपविभाग शहर उपविभाग व एमआयडीसी उपविभागात वीज चोरांची शोध मोहिम राबविण्यात आली. त्यात ५४ जणांनी वीज मिटरमध्ये फेरफार करून चोरी केल्याचे आढळून आले. या चोरांनी ३२ हजार ४०२ यूनिट विजेची चोरी केली व असून त्याचे ६ लाख ९४ हजार ९७० रूपये इतके मूल्य आहे. त्यांच्या विरूध्द भारतीय विद्युत कायदा कलम १३५ नुसार कारवाई करण्यात आली आहे, चोरीत वापरलेल्या ३२ हजार ४०२ युनिटच्या बिलाची वसुली प्रक्रियाही सुरू आहे.

तर त्याच कायद्यानुसार मोह्मद सरवार रा. गोपाळचावडी, मोह्मद हाजीक मोह्मद फारूक रा. मुजमपेठ, सुमन शिंदे रा. शिंदे गल्ली, सुनिल जाधव रा. धनेगाव, व्यंकट तोकलवाड रा. शंकरनगर, मोह्मद बाबू अहेमद रहेमान कुरेशी रा. महेबूबनगर, नदाफ नजूकमियाँ छोटेमियाँ रा. महेबूबनगर, रामकौर बाबुराव कांबळे दोन वीज जोडण्या रा. गोविंदनगर, हुलाजी अबाजी बोयेवार रा. गांधीनगर, दयानंद बुध्दाजी भालेराव रा. बेलानगर यांनीही मीटरमध्ये मोडमोड करून वीज चोरी केल्याप्रकरणी शहरातील पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आल्याचे नांदेड शहर विभागाचे कार्यकारी अभियंता शैलेश कलंत्री यांनी कळविले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# न्याय्य मार्ग शोधणे आवश्यक

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचे अस्त्र उगारले आहे. अंतरवाली सराटी येथे चालू असलेले त्यांचे हे अकरावे उपोषण आहे. राज्य सरकारने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दिलेला बारा मुद्द्यांचा मसुदा फेटाळून लावत, मागण्या पूर्ण झाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. १२ सप्टेंबरपर्यंत ठोस निर्णय झाला नाही तर मुंबईकडे कूच करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला आहे. हा केवळ एका समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न म्हणून सरकारने याकडे पाहणे, ही परिस्थिती अधिक गंभीर करण्याची चूक ठरेल. मराठा समाजाच्या मनात गेल्या अनेक वर्षांपासून साचत असलेला असंतोष आता पुन्हा रस्त्यावर येताना दिसत आहे. सरकारकडून आश्वासने, चर्चा, समित्या, मसुदे आणि कागदोपत्री प्रक्रिया यापलीकडे ठोस निर्णय कधी होणार, हा मराठा समाजाचा मूलभूत प्रश्न आहे. ५८ लाख कुणबी नोंदींची माहिती असलेली हार्ड डिस्क देण्यात आली, हैदराबाद गॅझेटच्या आधारे प्रमाणपत्रे देण्याची चर्चा झाली; मात्र आंदोलनकर्त्यांना अपेक्षित असलेला अधिकृत शासन निर्णय अर्थात जीआर हातात मिळत नसेल, तर सरकारच्या आश्वासनांवरील विश्वास का ठेवावा, असा सवाल उपस्थित केला जात आहे. म्हणूनच आता सरकारने आंदोलनाची तीव्रता नव्हे, त्यामागील वेदना समजून घेण्याची गरज आंदोलनकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. मराठा समाजातील मोठा वर्ग ग्रामीण भागात राहतो. शेती, बेरोजगारी, शिक्षणाचा वाढता खर्च, स्पर्धात्मक परीक्षांमधील तीव्र स्पर्धा आणि आर्थिक असुरक्षितता या समस्यांनी तरुण पिढी त्रस्त आहे. आरक्षण हा त्यांच्या दृष्टीने केवळ राजकीय मुद्दा नाही; तो शिक्षण आणि रोजगाराच्या संधींशी जोडलेला प्रश्न आहे. आरक्षण नसल्यामुळे नोकरीची संधी नाही. म्हणून उच्च गुणवत्ता असूनदेखील बेरोजगार राहण्याची पाळी आली आहे. अशा बेरोजगारांनी काय करावं, हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे केवळ आंदोलकांना शांत करण्यासाठी तात्पुरती आश्वासने देण्याऐवजी कायद्याच्या चौकटीत टिकणारा आणि सर्व संबंधित घटकांना न्याय देणारा मार्ग सरकारने शोधला पाहिजे. परंतु आज महाराष्ट्रातील संकट केवळ मराठा आरक्षणापुरते मर्यादित राहिलेले नाही. शेतकरीही प्रचंड संकटात आहे. पावसाची अनिश्चितता, काही भागांत अतिवृष्टी तर काही भागांत पावसाची दडी, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील अस्थिरता, कर्जाचा वाढता बोजा आणि पिकांच्या नुकसानी-मुळे ग्रामीण अर्थव्यवस्था हादरली आहे. शेतकऱ्याच्या हातात पैसा राहिलेला नाही आणि त्याच्या संकटाची दखल शासनाने पुरेशा गांभीर्याने घेतली आहे का, हा प्रश्न आता अधिक तीव्र होत आहे. मराठा समाज असो, शेतकरी असो, कामगार असो किंवा इतर बहुजन समाजघटक, सरकारविषयी वाढणारा रोष हा केवळ एका मागणीचा परिणाम नाही; तो शासनव्यवस्थेवरील विश्वास कमी होत असल्याचे लक्षण आहे. लोकांना वाटते की त्यांच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी आंदोलन करावे लागते, रस्त्यावर उतरावे लागते, उपोषण करावे लागते. लोकशाही-मध्ये ही स्थिती शासनासाठी निश्चितच चिंतेची बाब आहे. राजकीय पक्षांनीही या असंतोषाकडे केवळ मतांच्या गणितातून पाहणे टाळले पाहिजे. मराठा आरक्षणाचा प्रश्न असो किंवा शेतकऱ्यांचा प्रश्न, हे प्रश्न महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक भवितव्याशी जोडलेले आहेत. एका समाजाच्या मागणीचा दुसऱ्या समाजाच्या हक्कांशी संघर्ष निर्माण होणार नाही, याची काळजी घेताना सामाजिक सलोखा कायम ठेवणे ही सरकारची जबाबदारी आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे सरकारवर दबाव निर्माण झाला आहे. परंतु सरकारने हा दबाव संघर्ष म्हणून न पाहता जनतेच्या अस्वस्थतेचा इशारा म्हणून स्वीकारला पाहिजे. उपोषणकर्त्यांची प्रकृती बिघडण्याची वाट पाहणे, पुन्हा आंदोलन चिघळल्यानंतर चर्चा करणे आणि त्यानंतर आश्वासने देणे, हा मार्ग किती काळ चालणार? महाराष्ट्राला आंदोलनांची नव्हे, निर्णयांची गरज आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न कायदेशीर आणि घटनात्मक चौकटीत मार्गी लावण्यासाठी सरकारने स्पष्ट रोडमॅप द्यावा. त्याचवेळी शेतकरी, बेरोजगार तरुण आणि आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या बहुजन समाजाच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना कराव्यात. आजचा आक्रोश उद्याच्या मोठ्या सामाजिक संघर्षात बदलू नये, याची जबाबदारी सरकारची आहे. जनतेचा आवाज ऐकला नाही, तर तो अधिक मोठा होतो आणि महाराष्ट्राच्या सध्याच्या वातावरणात तो आवाज आता दुर्लक्षित करण्याइतका क्षीण राहिलेला नाही.

# श्रीकृष्ण: जगण्यातील दीपस्तंभ

श्रावण वद्य अष्टमीस मध्यरात्री श्रीकृष्णाचा जन्म झाला म्हणून हा दिवस श्रीकृष्ण जयंती किंवा गोकुळाष्टमी या नावाने साजरा केला जा-तो. देवकीच्या उदरातून जन्म झालेला श्रीकृष्ण म्हणजे आपल्या अंतरंगातील आकर्षक व म ोहक असे तत्व आहे. श्रीकृष्ण म्हणजे निखळ आनंद. कृष्ण जन्म म्हणजे अहंकाराच्या अंधकारावर, प्रेमरूपी प्रकाशाची मात . अनीतिवर ,नियतीचा मारा, निराशेवर आशेचा फवारा, दुःखावर हास्याची स्वारी. या व अशा अनेक विविध पैलूंनी कृष्ण जन्म आपणास जीवन उपयोगी तत्व व रसायन म्हणून अखंड आयुष्यभर जोपासता येईल. मनुष्याला जीवन जगत असताना, निखळ आनंदाचा अनुभव तेव्हाच घेता येतो, जेव्हा तो अपेक्षेच्या ओझ्या शिवाय जगतो. जेव्हा आपल्याला कुठलीच काळजी, चिंता नसते, तेव्हाच आपण आनंद अनुभवू शकतो. आनंदाची ही अवस्था म्हणजे श्रीकृष्ण होय. गोकुळाष्टमीला दहीहंडी फोडली जाते. ही दहीहंडी निखळ आनंदाचा उत्सव असून ,कृष्णाच्या वेगवेगळ्या लिला यातून आठवण करून देतात. श्रीकृष्ण जन्मानंतर दुसऱ्या दिवशी दहीहंडी आयोजित करण्यात येते. हे झाले या उत्सवाचे मूर्त स्वरूप ,पण खऱ्या अर्थाने कृष्ण तत्व अमूर्त रुपात जोपासता येईल, कारण श्रीकृष्णाचे महत्त्व व उपयोगिता केवळ भूतकाळात नसून, ती वर्तमान काळात व पुढे भविष्यात सुद्धा, युगानुयुगे निर्विवादपणे असणार आहे. आज जीवन जगत असताना, मानव अनेक प्रश्नांना सामोरे जाताना आढळून येतो. जीवनरूपी प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी, श्रीकृष्ण तत्व रुपी उत्तर, आपल्या जीवनाची नाव यशस्वीपणे किनाऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे उत्कृष्ट साधन असून, पवित्र गोकुळाष्टमीच्या अनुषंगाने, आपणास श्रीकृष्ण आपल्या जीवनातील अमूल्य दाता आहे, एक आदर्श व अमूर्त तत्व कसे आहे हे लक्षात घ्यायचे आहे.



आजच्या माणसाची अवस्था, महाभारतातील अर्जुना सारखी झालेली दिसते, माणसाच्या मनोभूमीत अनेक प्रश्नांचा, गोंधळाचा शिरकाव झालेला दिसून येतो. ज्याप्रमाणे कुरुक्षेत्रावर आपल्याच नातेवाईकांसोबत, म्हणजेच कौरवांसोबत लढाई करत असताना, उत्कृष्ट धनुर्धारी अर्जुन, मानसिक व शारीरिक दोन्ही टप्प्यावर पूर्णपणे खचून जातो व तो लढाई करण्यास तयार होत नाही,तेव्हा श्रीकृष्ण ,अर्जुनाच्या मनातील गोंधळ दूर करून, त्याला सत्याची जाणीव करून देतात व त्याला लढाई करण्यास तयार करतात. श्रीकृष्णाचा हा संदेश, आजही आपणास जीवन जगत असताना खूप उपयोगी पडतो ,कारण कौरवांसोबत लढा देणे म्हणजे असत्या विरुद्ध लढणे व धर्माचा विजय घडवून आणणे ही गोष्ट श्रीकृष्णाने अर्जुनास लक्षात आणून दिली. तद्वतच आजच्या मानवास, सत्य टिकवून ठेवण्यासाठी मग तो माणूस आपला असूनही, जर तो असत्याच्या बाजूने असेल, तर आपण सत्याच्या बाजूने होऊन, त्याचा विरोध करायला पाहिजे ही गोष्ट इथे लक्षात येते. आपण कृष्ण तत्व व शिकवण, आपल्या जीवनाची दिशा ठरवण्यासाठी वापरली, तर कृष्ण तत्व ज्याचा सारथी आहे त्याचा विजय निश्चित आहे. श्रीकृष्ण हे आपल्या जगण्यातील अमूर्त तत्व आहे. त्याचे जीवन तत्व, आपणास जगण्याची ऊर्जा देते, बिकट वाट, सरळ करते व त्यासाठी ,हे तत्व जोपासण्याची आवश्यकता आहे. कितीही अवघड समस्या असो;कृष्ण तत्व म नोमन आठवून, स्मरून व आचरून आपणास त्या समस्येवर मात करता येते.

श्रीकृष्णाने सखा, मित्र, गुरु, शिष्य, उत्कृष्ट सल्लागार, सारथी, पती व भाऊ या वेगवेगळ्या भूमिका अतिशय यशस्वीपणे पार पाडलेल्या दिसतात. द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगी, द्रौपदीला वस्त्र पुरवून मदत करणारा कृष्ण, आपणास स्त्री रक्षण शिकवतो. आपल्या गुरु प्रतीचा, कृष्णाचा आदरभाव देखील आपणास आदराची शिकवण देतो. त्याला, सुदामा सारखा गरीब मित्र ,गरीब न दिसता त्यात केवळ आपला सखा दिसतो. श्रीकृष्ण_सुदामा या जगातील अतिशय उत्कृष्ट व आदर्श मैत्रीचे नाते , मित्रत्वाचे अभेद्य बंधन म्हणून आपल्यापुढे उभे आहे. यावरून आपल्या लक्षात येते, की मित्रा पुढे गरिबी श्रीमंती ह्या बाबी निरर्थक व अतिशय क्षुल्लक असून, श्रीकृष्णाने माणुसकीच्या नात्याचे दर्शन इथे घडवलेले दिसून येते. इथे त्याने केवळ मित्र रुपी माणसाला महत्त्व दिले आहे. आपणही मित्र परिवारात जगताना किंवा समाजातील श्रीमंतांनी, गरीब व श्रीमंत ही दरी, श्री कृष्णा सारखी मानवतेची दृष्टी ठेवून कमी केली तर ही दरी कमी होऊ शकते.

आपल्या मनात कुरुक्षेत्रावरील युद्धा सारखे अनेक युद्धे चालूच असतात. काय चांगले, काय वाईट ही बाब जाणून घेण्यासाठी, आजच्या अर्जुनाला, श्रीकृष्णाच्या तत्वांचा खूप मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. श्रीकृष्ण आणि त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग आपल्याला आपले जीवन, आनंदाने, धैर्याने, संयमाने,चतुराईने जगण्यास शिकवतात. प्रचंड धकाधकीच्या या जी-वनात, बऱ्याच वेळा आपण घाई गडबड करतो, व अनेकदा महत्त्वाच्या कामातील निर्णय चुकतात. श्रीकृष्ण वर्तमानावर लक्ष द्यायचे,त्यांना भविष्यात कौरव-पांडवांच्या यूद्धा मध्ये काय होणार आहे याची स्पष्ट कल्पना असून सुद्धा, त्यांनी केवळ वर्तमानावर भर दिला व पांडवांना लढण्यास सांगितले .तद्वतच आपण सुद्धा भविष्याची काळजी न करता केवळ वर्तम ानातील जीवन जगले, तर आपणास अमूर्त सुखाचा साक्षीदार होता येईल.

श्रीकृष्ण यांच्या जीवनातून घेण्यासारखे आणखी एक तत्व म्हणजे, कुठल्याही फळाची अपेक्षा न करता, आपण आपले कार्य प्रामाणिक व प्रांजळपणे पार पाडणे, कार्याच्या परिणामाचा विचार न करता, आपण कार्य पार पाडले, तर नक्कीच आपल्याला यश मिळणार आहे. आपल्याला यश नाही मिळाले तरी अनुभवाची शिद-ोरी आपल्या सोबत असणार आहे ही महत्त्वाची बाब आपल्या लक्षात येते. कुठलेही काम करत असताना, आपण त्याग भावनेने ते करावे किंवा जीवनात काही गोष्टी मिळवण्यासाठी त्याग हा महत्त्वाचा असतो. जेव्हा कुरुक्षेत्रावर, भीमाचा मुलगा, म्हणजे घटोत्कचाचा वापर, कर्णाचे इंद्र अस्त्र क्षीण करण्यासाठी करतात, तेव्हा घटोत्कचाचा बळी जातो, त्याचा त्याग, श्रीकृष्ण, पांडवांच्या विजयासाठी करतात. अतिशय उत्कृष्ट बाबींच्या प्राप्तीसाठी, बऱ्याचदा मनुष्याला जीवनात त्यागी वृत्ती धारण करावी लागते, ही आणखी एक महत्त्वाची शिकवण या प्रसंगातून आपणास घेता येते.

श्रीकृष्णाकडून शिकण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे, जीवनात कुठल्याही प्रसंगी आपण आपल्या रागावर नियंत्रण मिळवणे. असे म्हणतात, की राग हा आपली स्मृती नष्ट करतो व मग आपली बुद्धी चालत नाही म्हणजे कार्य करत नाही. आजचा आधुनिक अर्जुन, जीवन जगताना अनेक टप्प्यावर विनाकारण रागात आपली बुद्धी भ्रष्ट करून घेताना आढळून येतो व अशा अवस्थेत मनुष्य विनाश स्थितीला पोहोचतो. म्हणून श्रीकृष्ण हा विवेक बुद्धीचा वापर करून योग्य तो निर्णय घेत असे. श्रीकृष्ण हास्याचा झरा, आनंदाचा निख्खळ प्रवाह, निरपेक्ष जीवनाचा शिल्पकार म्हणायला हरकत नाही. अप्रतिम संयमाचे दर्शन घडवणारा दर्शक म्हणू त्याच्याकडे पाहता येते.

श्रीकृष्णाचा जन्म म्हणजे आनंदाचे , प्रेमाचे प्रतीक असून, प्रेम व अहंकाराचे नाते असूच शकत नाही.श्रीकृष्ण रुपी आनंदाचा जन्म म्हणजे, कंस रुपी अहंकाराचा सर्वनाश होय. श्रीकृष्णाने त्याच्या जी-वनातून आपल्यासमोर घालून दिलेल्या आदर्श जी-वनाचे, पालन जर आपण केले, तर आपल्या जीवनरूपी कुरुक्षेत्रावर आपली अवस्था महाभारतातील आर्जूनासारखी होणार नाही. हिंदू धर्मातील पवित्र देव म्हणून पूजिला जाणारा हा श्रीकृष्ण परमात्मा , अतिशय साधे जीवन जगून, वेळप्रसंगी तो अर्जुनाच्या रथावरील सारथी होण्याच अतिशय सामान्य काम करतो. simple living high thinkingअसे म्हटल्या प्रमाणे, माणूस कितीही मोठा असो, त्याने आपले सामान्य जीवन न सोडता जगले,तर तो सामान्यातील असामान्य, माणूस होऊ शकतो ही बाब, श्रीकृष्णाच, सारथी हे रूप दर्शवते. मनातील सर्व विकार दूर करणारे अस्त्र म्हणजे श्रीकृष्ण जीवन सार होय.

चला तर मग या श्रीकृष्ण जयंती किंवा गोकुळाष्ट-मीच्या निमित्ताने, श्रीकृष्णाच्या शिकवणीला व तत्त्वांना, आपल्या जीवनाचा शिल्पकार बनवून, आपल्या जीवनाची नाव, यशस्वीपणे आनंदाच्या किनाऱ्यापर्यंत घेऊन जाऊया.

कृष्ण तत्व तो है, एक अनमोल रतन,
चलो करते हैं, इसका मनसे जतन!

**-प्रा. अमित शिंदे**
मु .पो. रोही पिंपळगाव.
ता .मुदखेड. जि. नांदेड.
मो. ९७६७८५१०४६

# वन्यजीव संरक्षण: आजचा संकल्प, उद्याचे भविष्य!

राष्ट्रीय वन्यजीव दिन दरवर्षी ४ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश वन्यजीवांचे संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि लोकांमध्ये वन्यजीवांविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे. जंगल वाचले तर वन्यजीव वाचतील, आणि वन्यजीव वाचले तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील! निसर्ग हा केवळ सुंदर दृश्यांचा खजिना नसून असंख्य जीवसृष्टीचे घर आहे. या निसर्गचक्रात वन्यजीवांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. वाघाची डरकाळी, हत्तींचा कळप, हरिणांची धाव, पक्ष्यांचा किलबिलाट आणि जंगलातील असंख्य जीव यामुळेच निसर्गाची परिसंस्था समृद्ध आणि संतुलित राहते. प्रत्येक प्राणी हा निसर्गाच्या विशाल साखळीतील एक महत्त्वाचा दुवा आहे.



मात्र आज जंगलतोड, वाढते शहरीकरण, प्रदूषण, अवैध शिकार, वन्यजीवांची तस्करी आणि नैसर्गिक अधिवासाचा होणारा ऱ्हास यामुळे अनेक वन्यजीवांच्या अस्तित्वावर संकट निर्माण झाले आहे. विकासाच्या नावाखाली आपण निसर्गापासून दूर जात आहोत आणि त्याचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवर होत आहे. एखादी वन्यजीव प्रजाती नष्ट होणे म्हणजे केवळ एका प्राण्याचे अस्तित्व संपणे नव्हे, तर पर्यावरणाच्या संतुलनातील एक महत्त्वाचा दुवा तुटणे होय. म्हणूनच आजच्या काळात वन्यजीव संरक्षण ही गरज नसून आपली नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे. वन्यजीवांचे रक्षण, जंगलांचे संवर्धन आणि जैवविविधतेचे जतन करण्याचा संकल्प आपण आजच केला, तर भावी पिढ्यांना समृद्ध, सुंदर आणि संतुलित निसर्गाचा वारसा देऊ शकतो. आज आपण घेतलेला प्रत्येक छोटासा पर्यावरणपूरक निर्णय हा उद्याच्या सुरक्षित भविष्याची भक्कम पायाभरणी ठरू शकतो.

वन्यजीव हे निसर्गाच्या समतोलाचे महत्त्वाचे घटक आहेत. वन्यप्राणी, पक्षी आणि इतर जीव अन्नसाखळी टिकवून ठेवण्यास मदत करतात. ते कीटकांचे नियंत्रण, वनस्पतींचे परागीभवन आणि बियांचा प्रसार यांसारख्या नैसर्गिक प्रक्रियांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे वन्यजीवांचे संरक्षण म्हणजे पर्यावरणाचे आणि आपल्या भविष्यातील जीवनाचे संरक्षण होय. जैवविविधता म्हणजे पृथ्वीवरील विविध प्राणी, पक्षी, वनस्पती आणि सूक्ष्मजीवांची समृद्ध विविधता होय. प्रत्येक जीव निसर्गाच्या संतुलनात महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे विविध जीवांचे अस्तित्व टिकवणे, त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे रक्षण करणे आणि पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे. जैवविविधतेचे संरक्षण म्हणजे निसर्गाचे आणि आपल्या भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करणे होय.

वन्यजीवांसाठी जंगल, गवताळ प्रदेश, नद्या, तलाव आणि पर्वतीय भाग हे नैसर्गिक अधिवास आहेत. मात्र जंगलतोड, अतिक्रमण, वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरणा-मुळे त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचा सतत ऱ्हास होत आहे. परिणामी अनेक प्राण्यांना अन्न, पाणी आणि सुरक्षित निवारा मिळणे कठीण होत आहे. त्यामुळे जंगलतोड रोखणे, वनक्षेत्र वाढवणे आणि नैसर्गिक अधिवासांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. वन्यजीवांचा अधिवास सुरक्षित असेल, तरच त्यांचे अस्तित्व आणि जैवविविधता टिकून राहील. बेकायदेशीर शिकार आणि वन्यजीवांची तस्करी ही वन्यजीवांच्या अस्तित्वासाठी गंभीर समस्या आहे. कातडी, दात, शिंगे, हाडे आणि इतर अवयवांसाठी अनेक प्राण्यांची निर्दयपणे शिकार केली जाते. यामुळे अनेक दुर्मिळ प्रजातींची संख्या झपाट्याने कमी होत असून त्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. वन्यजीव तस्करीला आळा घालण्यासाठी कठोर कायदे व प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. तसेच नागरिकांमध्ये वन्यजीव संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शिकार थांबवणे म्हणजे केवळ प्राण्यांचे प्राण वाचवणे नव्हे, तर निसर्गाचा समतोल जपणे होय.

पाणी आणि अन्न हे वन्यजीवांच्या जीवनासाठी अत्यावश्यक घटक आ-हेत. जंगलातील नद्या, तलाव, ओढे, विहिरी आणि इतर नैसर्गिक जलस्रोतांवर अनेक प्राणी व पक्षी अवलंबून असतात. जंगलतोड, प्रदूषण आणि पाण्याचा अतिरेकी वापर यामुळे हे जलस्रोत धोक्यात येत आहेत. त्याचबरोबर नैसर्गिक अन्नसाख-ळीमध्ये बदल झाल्यास वन्यजीवांना पुरेसे अन्न मिळणे कठीण होते. त्यामुळे जलस्रोत स्वच्छ व सुरक्षित ठेवणे, पाण्याचे संवर्धन करणे आणि जंगलातील नैसर्गिक अन्नस-ाखळी अबाधित राखणे आवश्यक आहे. पाणी आणि अन्नस्रोत सुरक्षित असतील, तरच वन्यजीवांचे जीवन सुरक्षित राहील. वृक्ष हे केवळ पर्यावरणाचे सौंदर्य वाढवत नाहीत, तर ते असंख्य वन्यजीवांना अन्न, निवारा आणि सुरक्षित अधिवास प्रदान करतात. जंगलतोडीमुळे वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास कमी होत असून पर्यावरणाचा सम तोलही बिघडत आहे. त्यामुळे अधिकाधिक स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड करून जंगलांचे क्षेत्र वाढवणे आवश्यक आहे. केवळ वृक्षारोपण करणे पुरेसे नसून लावलेल्या झाडांची योग्य निगा राखणे आणि विद्यमान जंगलांचे संरक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वृक्षसंवर्धनामुळे मातीची धूप कमी होते, पावसाचे प्रमाण संतुलित राहण्यास मदत होते आणि अनेक जीवांना नैसर्गिक आश्रय मिळतो. एक झाड म्हणजे अनेक जीवांचे घर हे लक्षात घेऊन प्रत्येकाने वृक्षारोपण व जंगलसंवर्धनात सक्रिय सहभाग घ्यायला हवा.

वन्यजीव संरक्षणासाठी केवळ कायदे आणि सरकारी उपाययोजना पुरेशा नाहीत, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि विविध माध्यमांद्वारे वन्यजीवांचे महत्त्व, त्यांच्यासमोरील धोके आणि संरक्षणाच्या उपाययोजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवली पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम आणि वन्यजीवांविषयी संवेदनशीलता निर्माण केल्यास भविष्यात पर्यावरणाबाबत जबाबदार नागरिक घडतील. पोस्टर, रॅली, व्याख्याने, निबंध स्पर्धा आणि जनजागृती अभियानांच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेता येते. जागरूक नागरिकच वन्यजीवांच्या संरक्षणासाठी प्रभावीपणे योगदान देऊ शकतात. वन्यजीव संरक्षणाच्या कार्यात जंगलांच्या आसपास राहणाऱ्या स्थानिक समुदायांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्थानिक नागरिकांना जंगल, वन्यप्राणी आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची जवळून माहिती असल्यामुळे त्यांच्या अनुभवाचा संवर्धनासाठी मोठा उपयोग होऊ शकतो. ग्रामस्थांनी जंगलतोड, अवैध शिकार, वन्यजीवांची तस्करी आणि जंगलातील आगी याबाबत सतर्क राहून संबंधित यंत्रणांना माहिती देणे आवश्यक आहे. तसेच वनसंवर्धन, जलसंधारण आणि वृक्षारोपणाच्या उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग वाढवला पाहिजे. स्थानिक लोकांना वन्यजीव संरक्षणाचे महत्त्व समजावून सांगून त्यांच्या उपजीविकेच्या गरजांचाही विचार केला, तर मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी होण्यास मदत होईल. स्थानिक सम ुदायांचा सहभाग म्हणजे वन्यजीव संवर्धनाला मिळणारी एक मजबूत आणि शाश्वत साथ होय.

वन्यजीव अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने ही वन्यप्राण्यांची नैसर्गिक घरे आ-हेत. येथे पर्यटन करताना पर्यटकांनी निसर्ग आणि वन्यजीवांचा आदर करणे आवश्यक आहे. प्राण्यांना खाद्य देणे, त्यांच्याजवळ जाणे, मोठ्याने आवाज करणे, प्लास्टिक किंवा कचरा टाकणे तसेच नियमांचे उल्लंघन करणे टाळले पाहिजे. पर्यटकांनी ठरवलेल्या मार्गांवरूनच प्रवास करून वन्यजीवांना त्यांच्या नैसर्गिक वातावरणात मुक्तपणे वावरू द्यावे. निसर्गाचा आनंद घेताना त्याचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेणे हाच खरा जबाबदार पर्यटनाचा अर्थ आहे.

वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ शासन, वनविभाग किंवा वन्यजीव तज्ज्ञांची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपण जंगलतोड रोखणे, वृक्षारोपण करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, वन्यजीवांबाबत जागरूकता निर्माण करणे आणि अवैध शिकार किंवा तस्करीविरोधात आवाज उठवणे आवश्यक आहे. आपल्या छोट्या-छोट्या कृतींमधूनही निसर्ग आणि वन्यजीवांचे संरक्षण करता येते. आज आपण निसर्गासाठी घेतलेली जबाबदारीच उद्याच्या पिढीला सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरण देईल. वन्यजीवांचे रक्षण करूया, जंगलांचे संवर्धन करूया आणि भावी पिढ्यांसाठी समृद्ध निसर्ग जतन करूया!

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

# 'पाकीजा' पुन्हा पडद्यावर; मीना कुमारींच्या अजरामर सौंदर्याला 4K पुनर्जन्म

भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात काही चित्रपट केवळ मनोरंजनाची साधने राहत नाहीत, तर ते काळाच्या पलीकडे जाऊन एक सांस्कृतिक ठेवा बनतात. 'पाकीजा' हा असाच एक अजरामर चित्रपट. कमाल अमरोही यांची दिग्दर्शकीय दृष्टी, मीना कुमारी यांचे विलक्षण अभिनयवैभव, राजकुमार यांची प्रभावी भूमिका, भव्य कलादिग्दर्शन आणि संगीत यामुळे 'पाकीजा'ने भारतीय चित्रपटसृष्टीत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. आता तब्बल पाच दशकांनंतर हा चित्रपट पुन्हा नव्या रूपात मोठ्या पडद्यावर येत आहे.



कमाल अमरोही यांनी आपल्या पत्नी आणि त्या काळातील उदयोन्मुख अभिनेत्री मीना कुमारी यांच्या सौंदर्याला कलात्मक दृष्टी देण्याच्या उद्देशाने १९५६ मध्ये 'पाकीजा'च्या निर्मितीला सुरुवात केली. मात्र या चित्रपटाचा प्रवास तितकासा सोपा नव्हता. निर्मिती सुरू झाल्यापासून प्रदर्शनापर्यंत तब्बल १५ वर्षे लागली. रंगीत चित्रपटाकडे झालेला बदल, स्टुडिओला लागलेली आग, कलाकारांच्या निवडीतील अडचणी, वाढते खर्च आणि प्रत्येक दृश्य परिपूर्ण करण्यासाठी कमाल अमरोही यांचा असलेला हट्ट यामुळे चित्रपटाचे काम वारंवार रखडत गेले. यातच १९६४ मध्ये मीना कुमारी आणि कमाल अमरोही यांच्यात दुरावा निर्माण झाला. चित्रपटाचे काम जवळपास ठप्प झाले. मात्र 'पाकीजा' हा केवळ कमाल अमरोही यांचा चित्रपट नव्हता; तो त्यांच्या आयुष्याचा ध्यास होता. अखेर १९६९ मध्ये सुनील दत्त आणि नर्गिस यांनी चित्रपटाचे चित्रीकरण पाहून मीना कुमारी यांना तो पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यानंतर चित्रपटाचे काम पुन्हा सुरू झाले. मात्र नियतीने या कलाकृतीची परीक्षाच घेतली. चित्रपट पूर्ण होण्यापूर्वीच जर्मन सिनेमॅटोग्राफर जो-सेफ व्हिर्शिंग आणि संगीतकार गुलाम मोहम्मद यांचे निधन झाले. अनेक अडथळे पार करत अखेर ४ फेब्रुवारी १९७२ रोजी 'पाकीजा' प्रदर्शित झाला. चित्रपटाला समीक्षकांची दाद मिळाली आणि तो बॉक्स ऑफिसवरही यशस्वी ठरला. मात्र प्रदर्शनानंतर अवघ्या काही आठवड्यांतच, ३१ मार्च १९७२ रोजी मीना कुमारी यांचे निधन झाले. त्यामुळे 'पाकीजा' हा त्यांच्या कारकिर्दीतील अखेरच्या आणि सर्वाधिक स्मरणात राहिलेल्या चित्रपटांपैकी एक ठरला.

'पाकीजा' आणि मीना कुमारी यांचे नाते केवळ अभिनेत्री आणि चित्रपट इतके मर्यादित नव्हते. या चित्रपटाशी त्या भावनिकदृष्ट्याही जोडलेल्या होत्या. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर 'स्टार अँड स्टाइल'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी 'पाकीजा'ला आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग म्हटले होते. मी या चित्रपटासोबत जवळजवळ तेवढेच आयुष्य जगले आहे, जेवढे त्याच्या निर्मात्यासोबत जगले आहे, असे त्यांनी म्हटले होते. कमाल अमरोही यांच्यासाठी 'पाकीजा' हे आयुष्याचे कार्य आणि जी-वनाचा उद्देश होता, तर मीना कुमारी या त्या कलाकृतीचे शारीरिक, आध्यात्मिक आणि दृश्य रूप बनल्या होत्या. याच कारणामुळे 'पाकीजा' पाहताना प्रेक्षकांना केवळ एका अभिनेत्रीचा अभिनय दिसत नाही; तिच्या व्यक्तिरेखेतून मीना कुमारी यांच्या भावविश्वाचीही झलक जाणवते.

'पाकीजा'मध्ये नवाब शाहाबुद्दीन यांची भूमिका साकारणारे ज्येष्ठ अभिनेते अशोक कुमार यांनीही मीना कुमारिंच्या अभिनयप्रतिभेचे भरभरून कौतुक केले होते. त्यांच्या मते, भारतीय पडद्याने पाहिलेल्या दोन महान प्रतिभावंतांच्या सहवासात राहण्याची संधी 'पाकीजा'मुळे त्यांना मिळालीकवी-दिग्दर्शक कमाल अमरोही आणि मीना कुमारी. त्या भारतीय पडद्याने आजवर पाहिलेल्या कदाचित सर्वश्रेष्ठ कलाकार आहेत आणि सदैव राहतील, अशा शब्दांत त्यांनी मीना कुमारींचा गौरव केला होता.

'पाकीजा'चा प्रवास हा केवळ एका चित्रपटाच्या निर्मितीची कथा नाही. तो एका दिग्दर्शकाच्या स्वप्ना-चा, एका अभिनेत्रीच्या समर्पणाचा आणि भारतीय चित्रपटसृष्टीच्या बदलत्या काळाचा दस्तऐवज आहे.

१९५० आणि १९६०च्या दशकातील उर्दू-प्रभावित साहित्यिक भाषा, नजाकत, भव्य स्टुडिओ सेट्स आणि संगीतप्रधान कथनशैलीपासून भारतीय सिनेमा पुढे आधुनिक, शहरी आणि ॲक्शनप्रधान कथांकडे वळत असताना 'पाकीजा'ने आपल्या काळाची एक वेगळी सौंदर्यदृष्टी जपली. ब्रिटिश चित्रपट समीक्षक आणि इतिहासकार डेरेक माल्कम यांनी 'पाकीजा'ला 'आजवर बनवलेल्या सर्वांत विलक्षण संगीतप्रधान मेलोड्रामांपैकी एक' असे संबोधले होते. आज ४घ तंत्रज्ञानाच्या माध्यमातून 'पाकीजा' पुन्हा जिवंत होत असताना मीना कुमारिंचे अभिनयवैभव, कम ाल अमरोही यांची कलात्मक दृष्टी आणि त्या काळातील भारतीय सिनेमाचे सौंदर्य नव्या पिढीसमोर पुन्हा उलगडणार आहे. 'पाकीजा'चा हा पुनर्जन्म म्हणजे केवळ जुन्या चित्रपटाचे पुनर्संचयन नाही; तो भारतीय चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळाला दिलेली नव्या पिढीची आदरांजली आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि. सांगली

# बारडमध्ये मराठा आरक्षणासाठी चक्काजाम

**▶ बौद्ध, मुस्लीम समाज बांधवांचा सहभाग ▶ मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा**

**मुदखेड (प्रतिनिधी)–** सकल मराठा बांधवांच्या वतीने आरक्षणाच्या मागणीसाठी तसेच संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा देण्यासाठी समाज बांधवांच्या वतीने करण्यात आलेल्या चक्काजाम आंदोलनात बौद्ध व मुस्लीम समाजाने सहभाग नोंदवून पाठिंबा दिला आहे. मराठा आरक्षणाच्या प्रमुख मागणीसाठी समाजाने आक्रमक होत सरकारच्या विरोधात घोषणा देत निषेध नोंदवला आहे.



मराठा आरक्षणाच्या प्रमुख मागणीसाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दि. २९ अंतरवाली सराटी या ठिकाणी आमरण उपोषण सुरू केले आहे. सहा दिवस उलटूनही याची दखल घेतली जात नसल्याने सकल मराठा समाज बांधवांनी रस्ता रोकोचा इशारा दिला होता. बारड (ता. मुदखेड) नगरीत दि. ३ (गुरुवार) राष्ट्रीय महामार्गावरील मुख्य चौकात रास्ता रोको करण्यात आला. सरकारच्या दुटप्पी धोरणाच्या विरोधात विजय देशमुख, माधव पावडे, प्रताप देशमुख, गणपत शिंदे, ज्ञानेश्वर पवार यांनी कडाडून टीका केली. मराठा समाज बांधवांनी आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, एक मराठा लाख मराठा या घोषणांनी लक्ष वेधून घेतले होते.

राष्ट्रीय महामार्गावरील रस्ता जामने एक तास वाहतूक ठप्प झाली होती. दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल घेऊन त्वरित मागण्या मान्य कराव्या अशा आशयाचे लेखी निवेदन सकल समाज बांधवांच्या वतीने विजय देशमुख, दीपक पाटील, माधव पावडे, महेश देशमुख बारडकर, आकाश पवार, कृष्णकांत देशमुख, शंकर पांडागळे, ज्ञानेश्वर पवार, राजेश पवार, भगवान पवार, दिगंबर लखे पाटील, ओम पवार निवघेकर, पांडुरंग पाटील शिंदे, शंकर मुंगल, आनंदा नादरे, बबलू देशमुख, नितीन भोसले, संभाजी देशमुख, न्यू देशमुख, सचिन कल्याणकर, गजानन देशमुख, पुंडलिक देशमुख, अमोल पुयड यांच्यासह निवघा, डोंगरगाव, बारड, जवळा मुऱ्हार, नागेली, शेंबोली, पांढरवाडी, बोरगाव नाद्री आदी गावातील मराठा समाज बांधवांच्या वतीने पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहे. या आंदोलनात धोंडीबा आठवले, बाबा मौलाना यांनी सहभाग नोंदवून बौद्ध व मुस्लीम समाजाचा पाठिंबा असल्याचे सांगितले.

**बारड बंदची हाक**

सकल मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रमुख मागणीसाठी शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी गाव बंदची हाक देण्यात आली आहे. संघर्ष योद्धा मनोज जरंगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा म्हणून व्यापाऱ्यांनीही प्रतिष्ठाने बंद ठेवून सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. या बंदमध्ये सर्व व्यापाऱ्यांनी सहभागी होऊन बंदला पाठिंबा देण्याची विनंती विजय देशमुख यांनी केली आहे.

# स्टेनोग्राफर पदाबाबत विद्यार्थ्यांचे आमरण उपोषण; रासप व युवासेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा पाठिंबा




**नांदेड (प्रतिनिधी)–** स्टेनोग्राफर (लघुलेखक) संवर्गाबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या निषेधार्थ तसेच पदे पूर्ववत करण्याच्या प्रमुख मागणीसाठी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विद्यार्थ्यांकडून गेल्या आठ दिवसांपासून आमरण उपोषण सुरू आहे. यावेळी आंदोलनकर्त्या विद्यार्थिनींसोबत युवा सेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांचेही भ्रमणध्वनीद्वारे बोलणे करून देण्यात आले.

स्टेनोग्राफर पदासंदर्भातील शासन निर्णय रद्द करावा, राज्यातील विविध शासकीय विभागांतील लघुलेखक पदे पूर्ववत सुरू करावीत तसेच रिक्त पदांची भरती पारदर्शक पद्धतीने करण्यात यावी, अशा विविध मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या आहेत.

या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) विभागीय सचिव महेश खेडकर, उपजिल्हा प्रमुख सचिन पाटील व राष्ट्रीय समाज पक्ष नांदेड जिल्हाध्यक्ष शिवकुमार देवकते यांनी उपोषणस्थळी विद्यार्थ्यांची भेट घेतली. विद्यार्थ्यांच्या मागण्या जाणून घेत त्यांना आपला जाहीर पाठिंबा दिला.

विद्यार्थ्यांनी अनेक वर्षे मेहनत घेऊन स्टेनोग्राफर पदासाठी तयारी केली आहे. शासनाच्या निर्णयामुळे त्यांच्या भवितव्यावर परिणाम होऊ नये. प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

आठ दिवसांपासून उपोषण सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळे शासन व प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी युवासेना उपजिल्हा प्रमुख सचिन पाटील व रासप जिल्हाध्यक्ष शिवकुमार देवकाते यांनी केली.

# पत्नीचा गळा आवळून खून करणाऱ्या पतीला जन्मठेप; कंधार सत्र न्यायालयाचा निकाल

**नांदेड (प्रतिनिधी) –**माहेरहून ऑटो घेण्यासाठी पैसे आणत नाही म्हणून पत्नीचा स्कार्फने गळा आवळून खून केल्याप्रकरणी कंधारच्या अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. एन. पाटील यांनी मुख्य आरोपी पतीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

दि. ३ मार्च २०२१ रोजी बहादरपुरा, कंधार येथे आरोपी ग्यानोबा नागोराव गायकवाड (पती), गिरीश नागोराव गायकवाड (दीर) व नागोराव गायकवाड (सासरा) यांनी संगनमत करून विवाहितेला माहेरहून ऑटो घेण्यासाठी पैसे आण म्हणून शारीरिक व मानसिक छळ केला. त्यानंतर तिचा गळा स्कार्फने आवळून खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून कंधार पोलीस ठाण्यात गु.र.नं. ९७/२०२१, कलम ३०२, ४९८(अ), २०१, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सहायक पोलीस निरीक्षक संग्राम जाधव यांनी घटनास्थळ पंचनामा, जप्ती, एफएसएल तपासणी, साक्षीदारांचे जबाब व वैद्यकीय अहवालासह सखोल तपास करून वेळेत दोषारोपपत्र दाखल केले. हा खटला सेशन केस क्र. ४१/२०२१ म्हणून न्यायालयात चालला.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने स्थापन करण्यात आलेल्या Trial Monitoring Cell च्या माध्यमातून या खटल्यावर विशेष लक्ष ठेवण्यात आले.

सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता महेश कागणे यांनी भक्कम पुरावे व साक्षीदारांची साक्ष प्रभावीपणे मांडली. त्यांना पोउपनि नईम खान, एस. डी. मुंडे व अंमलदार मगदुम शेख यांनी सहकार्य केले.

पुराव्यांची दखल घेत न्यायालयाने मुख्य आरोपी ग्यानोबा नागोराव गायकवाड याला कलम ३०२ अन्वये जन्मठेप व ५ हजार रुपये दंड, कलम ४९८(अ) अन्वये ३ वर्षे सश्रम कारावास व १ हजार रुपये दंड, कलम २०१ अन्वये ६ वर्षे सश्रम कारावास व २ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. सर्व शिक्षा एकत्रितपणे भोगावयाच्या आहेत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# मुखेड तालुक्यात गांजा विक्री करणाऱ्यावर देगलूर डीवायएसपींची कारवाई; सव्वा किलो गांजा व रोपटे जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत देगलूर उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांनी मुखेड हद्दीत कारवाई करत १ किलो ११५ ग्रॅम वाळलेला गांजा व १२५ ग्रॅम गांजाचे हिरवे रोपटे जप्त केले आहे.

दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी मौजे उंद्री, ता. मुखेड येथील सुधाकर संतुकराव वडजे हा गांजा बाळगून विक्री करत असल्याची गोपनीय माहिती उपविभागीय अधिकारी पोपळघट यांना मिळाली. एनडीपीएस कायद्यानुसार कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून शासकीय पंच, राजपत्रित अधिकारी, वजन काटा व फोटोग्राफरसह पथक तयार करण्यात आले.



दि. ३ सप्टेंबर रोजी मध्यरात्री ००.१५ वाजता आरोपीच्या घराच्या अंगणात झडती घेतली असता वाळलेल्या गांजाचे शेंडे व चुरा आणि मातीत लावलेले एक हिरवे रोपटे आढळले. पंचांसमक्ष वजन केले असता वाळलेला गांजा १.११५ किलो (किंमत २५ हजार रुपये) व रोपटे १२५ ग्रॅम भरले.

या प्रकरणी आरोपी सुधाकर संतुकराव वडजे (वय ३५, रा. उंद्री, ता. मुखेड) याच्या विरुद्ध मुखेड पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३१०/२०२६, कलम ८ (क), २०(२)(ब) एनडीपीएस अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील व सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली डीवायएसपी किरण पोपळघट, पो. नि. चिंताबर कामठेवाड, पोउपनि अभिजीत तुतुरवाड, अंमलदार रविंद्र भुले, अमोल सुंडगे, प्रवीण कुरे, तसेच देगलूरचे पोउपनि म्हैसनवाड, विशाल आटकोरे, माधव मरगेवाड, रिहाना शेख यांनी पार पाडली.

# भोकर पोलिसांचा जुगार अड्ड्यावर छापा; ११ जुगारी ताब्यात, २.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेत भोकर पोलिसांनी मोघाळी येथील पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या 'अंदर-बाहर' जुगार अड्ड्यावर धाड टाकून ११ जणांना ताब्यात घेतले आहे.

बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी भोकर तालुक्यातील मोघाळी येथे जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळताच भोकर पोलीस पथकाने छापा मारला. या छाप्यात भोकर पोलिसांनी नरसिंग आनंदा राचेवाड (वय ४०), दत्ताहरी संभाजी शिंदे (वय ३७), साहेबराव किशन पंतुलवाड (वय २७), भास्कर ब्रम्हदेव उपरवट (वय ४०, रा. देऊळगाव, ता. पातूर, जि. अकोला), पिराजी लक्ष्मण धोतरे (वय ४२, रा. चिंचाळा), हर्षवर्धन उत्तम देवके (वय ३७), मोहन गंगाधर वाघमारे (वय ५०), आनंदा हणमंतराव सोळंके (वय ४६), पांडुरंग दिगंबर कदम (वय ४१), चांदू नागोराव शिंदे (वय ६५), बालाजी उत्तमराव पवार (वय ४६) सर्व रा. मोघाळी, ता. भोकर यांना अटक करून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी ६ मोबाईल फोन १ लाख २ हजार ५०० रुपये, १ मोटारसायकल १ लाख रुपये, रोख १२ हजार ७०० रुपये व जुगाराचे साहित्य असा एकूण २ लाख १५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी भोकर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४६१/२०२६, कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बंदी असूनही गुटखा विक्री; देगलूर पोलिसांची धडक कारवाई, चौघे जाळ्यात



**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेत देगलूर पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा विक्री व वाहतूक करणाऱ्या टोळीवर कारवाई करत ७ लाख ५८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ३ सप्टेंबर रोजी प्रभारी अधिकारी परि. उपविभागीय पोलीस अधिकारी वैभव पडवळ यांना नरंगल रोडवरील मोहम्मद जाकेर शेख यांच्या घरामागील मोकळ्या जागेत गुटख्याची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पथकाने पंचांसमक्ष छापा टाकला असता ETIOS कार क्र. MH-12 GZ 2345 (किंमत ५ लाख) मध्ये २६ हजार २६० रुपयांचा गुटखा ऑटो क्र. MH-26 G 2298 (किंमत २ लाख) मध्ये १७ हजार ८६० रुपयांचा गुटखा, हणमंत थडके यांच्या नरेंद्र मिल्क डेअरी दुकानातून ५ हजार ७०० रुपयांचा गुटखा, अशोक कोंडेवाड याच्या पोत्यातून ४ हजार ५८० रुपयांचा गुटखा असा एकूण ७ लाख ५८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी सय्यद मसीयोद्दीन ऊर्फ बबलू सय्यद रियाजोद्दीन (वय २५), शेख सलमान शेख जानी (वय २१, दोघे रा. घुमट बेस, देगलूर), हणमंत विठ्ठल थडके (वय ५०, रोहिदास चौक), अशोक लक्ष्मण कोंडेवाड (वय २८, लाईन गल्ली) या चौघांविरुद्ध देगलूर पोलीस ठाण्यात गु. क्र. ४१३/२०२६, कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) BNS व अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम २६, २७, २३, ३०(२)(३), ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांच्या मार्गदर्शनाखाली परि. उपविभागीय पोलीस अधिकारी वैभव पडवळ, पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड, मपोउपनि किरण बेंबडे, अंमलदार चामलवाड, घुगे यांनी पार पाडली.

# डॉ. अनुष्का गट्टूवार यांचे एम्स रायपूरमध्ये यश



**नांदेड (प्रतिनिधी)–** यशनगरी येथील रहिवासी डॉ. अनुष्का राजेश गट्टूवार यांनी वैद्यकीय शिक्षणात उल्लेखनीय यश संपादन करत भारतीय आयुर्विज्ञान संस्था (IIMS) रायपूर, छत्तीसगड येथून उत्कृष्ट गुणांसह MBBS पदवी प्राप्त केली आहे. विशेष म्हणजे नुकत्याच पार पडलेल्या पदवीदान समारंभात भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते डॉ. अनुष्का यांना MBBS पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. अनुष्का ह्या तहसीलदार संजय वारकड यांच्या भाची होत.

डॉ. अनुष्का गट्टूवार या मूळच्या बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील असून, त्यांचे वडील राजेश गट्टूवार हे महापारेषणच्या औष्णिक विद्युत केंद्र, पारस, जि. अकोला येथे अधीक्षक अभियंता म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# सिडको येथील श्रीकृष्ण मंदिरात जन्मोत्सव निमित्ताने दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा निमित्ताने श्रीकृष्ण मंदिर संभाजी चौक सिडको येथे दोन दिवसीय विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने दि. ४ सप्टेंबर रोजी धुप आरती व सायंकाळी ४ वाजता मुख्य रस्त्याने मिरवणूक, सायंकाळी श्रीकृष्ण जन्मोत्सव व महाआरती व ५ सप्टेंबर रोजी धुपारती, दही-लोणी प्रसाद वितरण, दुपारी १ वाजल्यापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे.



यावेळी भगवदगीता पारायण, श्रीकृष्ण नामजप, श्रीकृष्ण चालिसा स्तोत्र पारायण, प्रवचन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार, दि. ४ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वा. धुपआरती व प्रसाद ७ ते ९, श्रीकृष्ण नाम महिमा स्तोत्र पारायण १० ते ११.३०, श्रीकृष्ण मूर्तीची ५०१ पुष्पानी महापूजा श्रीमान अध्यक्षांच्या हस्ते होणार आहे.

११.३० कापूर आरती व प्रसाद, दुपारी २ वाजता श्रीकृष्ण नामस्मरण, ४ वा. श्रीकृष्ण मूर्तीची भव्य मिरवणूक सिडको परिसरातील मुख्य मार्गावरील भागातून निघेल. रात्री ११ ते १२ श्रीकृष्ण जन्मोत्सव महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. ५ सप्टेंबर रोजी ७ वाजता धुपआरती, दही व लोणीप्रसाद वितरण, ७ ते ९ श्रीद्वारकाधी कृष्ण नामजप ९ ते १० श्रीमद् भागवतगीता पारायण, दर्शनाचार्य डॉ. गोविंदराज शास्त्री धाराशिवकर यांचे प्रवचन, गोपालकाला, दहिहंडी व आरती आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १ वाजल्यापासून महाप्रसाद होईल.

या सोहळ्याला भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन व्यवस्थापक श्रीकृष्ण युवक मंडळ, श्रीकृष्णनगर, संभाजी चौक, सिडको, नांदेड व श्रीकृष्ण मंदिर महानुभाव विश्वस्त मंडळ, राजश्री जामोदेकर, कै.गुरूवर्य प. पू. कृष्णराज महाराज जामोदेकर यांनी केले आहे.

# विद्यार्थी परिषद निवडणुका तातडीने घेण्याची विद्यापीठ विकास मंचची कुलगुरूंकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्यापीठाच्या कारभारात लोकशाही पद्धतीने विद्यार्थी व प्राधिकरणांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील सर्व प्राधिकरणांच्या निवडणुका विद्यापीठ कायदा २०१६ नुसार पूर्ण करून प्राधिकरणांचे गठन वेळेत करावे, तसेच सन २०१९ पासून बंद असलेल्या विद्यार्थी परिषद निवडणुका तातडीने सुरू कराव्यात, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पुरस्कृत विद्यापीठ विकास मंचने स्वाराती मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



या मागण्यांसंदर्भात विद्यापीठ विकास मंचाच्या वतीने कुलगुरू मनोहर चासकर यांना मंगळवार, दि. १ सप्टेंबर रोजी निवेदन देण्यात आले. विद्यापीठाच्या प्रशासकीय कारभारात पारदर्शकता, विद्यार्थ्यांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग, परीक्षा व्यवस्थेतील गतिमानता, शैक्षणिक गुणवत्ता, रोजगाराच्या संधी आणि विद्यार्थी सुविधांना प्राधान्य देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ६२ (१) व (२) नुसार विद्यापीठ प्राधिकरणांच्या निवडणुका निर्धारित कालमर्यादेत घेणे अपेक्षित असल्याने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत सर्व प्राधिकरणांच्या निवडणुका पूर्ण करून त्यांचे गठन करण्यात यावे, अशी मागणी मंचाने केली आहे. त्याचबरोबर कायद्याच्या कलम ९९ नुसार विद्यार्थी परिषद निवडणुका तातडीने सुरू कराव्यात. सन २०१९ पासून विद्यार्थी परिषद निवडणुका झाल्या नसल्याने विद्यापीठाच्या निर्णयप्रक्रियेत विद्यार्थ्यांचा लोकशाही सहभाग प्रभावीपणे राहिलेला नाही. त्यामुळे विद्यार्थी प्रतिनिधित्वाची प्रक्रिया पुन्हा सुरू करून विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घ्यावे, अशी भूमिका मंचाने मांडली आहे.

अभ्यास मंडळामध्ये अंतिम वर्षातील विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीतील गुणवंत विद्यार्थ्याला निमंत्रित सदस्य म्हणून सहभागी करून घेण्याची तरतूद प्रभावीपणे लागू करावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला आणि त्यांच्या शैक्षणिक दृष्टिकोनाला विद्यापीठाच्या अभ्यासक्रमविषयक निर्णय प्रक्रियेत स्थान मिळणे आवश्यक असल्याचे मंचाने म्हटले आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व्यवस्थेतील विलंबाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणावर होत असल्याने सर्व विषयांचे निकाल परीक्षा झाल्यानंतर ४५ दिवसांच्या आत जाहीर करण्यासाठी निश्चित वेळापत्रक तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निकालास विलंब झाल्यास संबंधित यंत्रणेची जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती कार्यवाही करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यात विद्यापीठ उपकेंद्र सक्षमपणे कार्यान्वित करावे. ज्या जिल्ह्यांमध्ये अद्याप उपकेंद्र उपलब्ध नाही तेथे तातडीने उपकेंद्र सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. महाविद्यालये व वर्गांमधील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती हा देखील महत्त्वाचा विषय असून, विद्यार्थी, पालक, शिक्षक व महाविद्यालय प्रशासन या सर्व घटकांशी संवाद साधून अनुपस्थितीची कारणे शोधावीत आणि त्यावर परिणामकारक उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका मंचाने घेतली आहे.

# अंतर्मन

# भगवान श्रीकृष्णाची पूजा कशी करावी?

## तयारीपासून पूजाविधीपर्यंत जाणून घ्या संपूर्ण नियम



## जन्माष्टमीच्या रात्री करा 5 उपाय; जीवनातील अडचणी होतील दूर...

**भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला कृष्ण जन्माष्टमी साजरी केली जाते. भगवान श्रीकृष्णाच्या भक्तांसाठी हा दिवस श्रद्धा, भक्ती आणि प्रेमाने भारलेली विशेष रात्र मानली जाते. शास्त्रांमध्ये जन्माष्टमीची रात्र अत्यंत दुर्लभ आणि सिद्ध रात्र मानली गेली आहे. आपल्या जीवनात आर्थिक अडचणी, करिअरमधील अडथळे किंवा कौटुंबिक समस्या सातत्याने सुरू असतील, तर त्यातून मार्ग काढण्यासाठी ज्योतिषशास्त्रात काही सोपे उपाय सांगितले आहेत. वास्तुगुरूंच्या मते, जन्माष्टमीच्या रात्री श्रद्धेने केलेले काही उपाय जीवनातील अडचणी दूर करण्यास उपयुक्त ठरू शकतात.**

### दूध, दही आणि मधाने महाभिषेक

धन आणि समृद्धीशी संबंधित अडचणींसाठी जन्माष्टमीच्या रात्री दही, मध आणि केशरयुक्त दुधाने बालगोपालांचा महाभिषेक करावा. या उपायामुळे आर्थिक अडथळे दूर होण्यास मदत होते, असे मानले जाते. आर्थिक तंगीपासून मुक्ती हवी असल्यास दक्षिणावर्ती शंखात पाणी भरून श्रीकृष्णाचा अभिषेक करण्याचाही उपाय सांगितला आहे. वास्तुगुरूंच्या मते, या उपायामुळे अडकलेले धन परत मिळण्यास मदत होते, अशी श्रद्धा आहे.

### चांदीची बासरी अन् मुकुट अर्पण करा

करिअरमध्ये प्रगती आणि यश मिळावे यासाठी लड्डू गोपालांना छोटी चांदीची बासरी आणि सुंदर मुकुट अर्पण करावा. चांदीची बासरी शक्य नसल्यास लाकडी बासरीही भगवान श्रीकृष्णाला अर्पण करता येते. कान्हाला चांदीची बासरी आणि मुकुट अर्पण केल्याने करिअरमधील अडथळे दूर होण्यास आणि समाजातील मान-सन्मान वाढण्यास मदत होते, अशी मान्यता आहे.

### पिवळे वस्त्र अन् मोरपिसाचा उपाय



कौटुंबिक सुख- शांती आणि सुरक्षिततेसाठी श्रीकृष्ण जन्मोत्सवानंतर बालगोपालांना नवीन वस्त्रे परिधान करावीत. कान्हाला चमकदार पिवळे वस्त्र परिधान करून त्यांच्याजवळ सुंदर मोरपिस ठेवावे. पिवळा रंग गुरू आणि विष्णू तत्त्वाशी संबंधित मानला जातो. त्यामुळे घरातील कलह शांत होण्यास मदत होते, अशी धार्मिक मान्यता आहे. तसेच मोरपिस घरातील नकारात्मक ऊर्जा शोषून घेते आणि कुटुंबातील प्रेम वाढवते, असेही मानले जाते.

### माखन-मिश्री आणि तुळशीदलाचा नैवेद्य

जन्माष्टमीची पूजा पूर्ण झाल्यानंतर कान्हाला माखन, मिश्री आणि धनियाची पंजीरी अर्पण करावी. त्यावर तुळशीचे पान आवर्जून ठेवावे. भगवान श्रीकृष्णाला तुळशीदलाशिवाय नैवेद्य अर्पण करू नये, अशी धार्मिक मान्यता आहे. हा प्रसाद अर्पण केल्याने घरात सुख-समृद्धी नांदते आणि नातेसंबंधांमधील कटुता दूर होण्यास मदत होते, असे मानले जाते.

### ‘ॐ क्लीं कृष्णाय नम:’ मंत्राचा जप

करिअरमधील अडथळे दूर करून यश मिळवण्यासाठी जन्माष्टमीच्या रात्री पूजेच्या वेळी शांत चित्ताने कुशासन किंवा लोकरीच्या आसनावर बसावे. त्यानंतर तुळशीच्या माळेने ‘ॐ क्लीं कृष्णाय नमः’ या मंत्राचा १०८ वेळा जप करावा. या मंत्राच्या जपामुळे आत्मविश्वास वाढण्यास आणि करिअरमध्ये नवीन संधींचे मार्ग खुले होण्यास मदत होते, अशी श्रद्धा आहे.

### जन्माष्टमीच्या पूजेचे काही महत्त्वाचे नियम

व्रताचे पारण नेहमी मध्यरात्रीची पूजा झाल्यानंतर किंवा दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतरच करावे. जन्माष्टमीच्या दिवशी घरात स्वच्छता ठेवावी. तसेच या पवित्र दिवशी कोणाशीही कटू शब्दांत बोलणे टाळावे. वास्तुगुरूंच्या मते, भगवान श्रीकृष्ण हे भक्तीभावाला महत्त्व देतात. त्यामुळे कोणताही उपाय करताना मनात श्रद्धा, विश्वास आणि प्रेमभाव असणे आवश्यक आहे. अशा भावनेने केलेल्या पूजेमुळे श्रीकृष्णाची विशेष कृपा प्राप्त होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे.



**जन्माष्टमीला भगवान श्रीकृष्णाची विधिवत पूजा करून त्यांच्या जन्मोत्सवाची तयारी केली जाते. आपणही जन्माष्टमीचे व्रत करणार असाल, तर त्यासाठीची पूर्वतयारी, पूजाविधी आणि महत्त्वाचे नियम जाणून घेणे आवश्यक आहे.**

भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला जन्माष्टमी साजरी केली जाते. या दिवशी भक्त विधिपूर्वक लड्डु गोपालांची पूजा करतात आणि व्रत ठेवतात. यासाठी अनेक जण काही दिवस आधीपासूनच तयारीला सुरुवात करतात. लड्डु गोपालांसाठी पाळणा सजविणे, नैवेद्य तयार करणे आणि मध्यरात्री होणाऱ्या जन्मोत्सवाची तयारी केली जाते. जन्माष्टमीचे व्रत केल्याने भगवान श्रीकृष्णाची कृपा प्राप्त होते आणि जीवनात सुख-समृद्धीचे योग निर्माण होतात, अशी धार्मिक मान्यता आहे. मात्र, जन्माष्टमीची तयारी आणि पूजा करताना काही महत्त्वाचे नियम पाळणे आवश्यक मानले जाते.

### जन्माष्टमी व्रताचे विधान

भगवान श्रीकृष्णाचा जन्म भाद्रपद कृष्ण अष्टमीला रोहिणी नक्षत्रात मध्यरात्री झाला, अशी पौराणिक मान्यता आहे. त्यामुळे जन्माष्टमीच्या पूजेसाठी मध्यरात्री व्यापून असलेली अष्टमी तिथी अधिक महत्त्वाची मानली जाते. शास्त्रांमध्ये अष्टमी तिथीचे शुद्धा आणि वृद्धा असे भेद सांगितले आहेत. सूर्योदयापासून पुढील सूर्योदयापर्यंत असलेली तिथी शुद्धा मानली जाते, तर सप्तमी किंवा नवमीचा संयोग असल्यास तिचे वेगवेगळे प्रकार मानले जातात. मात्र, सिद्धान्तानुसार मध्यरात्री असलेली अष्टमी तिथी अधिक ग्राह्य मानली जाते. जर अष्टमी तिथी दोन दिवस मध्यरात्री व्यापत असेल किंवा दोन्ही दिवशी मध्यरात्री व्यापत नसेल, तर सप्तमी-विद्धा अष्टमीचा त्याग करून नवमी-विद्धा अष्टमी स्वीकारावी, असे शास्त्रात सांगितले आहे. हे व्रत बालक, कुमार, तरुण तसेच वृद्ध अशा सर्व वयोगटांतील स्त्री-पुरुष करू शकतात. या व्रतामुळे पापांचे क्षालन होऊन सुख-समृद्धीत वाढ होते, अशी धार्मिक मान्यता आहे. अष्टमीच्या दिवशी उपवास आणि पूजा करून नवमी तिथीला पारण केल्याने व्रताची पूर्तता होते.

### जन्माष्टमीला श्रीकृष्णाची पूजा करण्याची पद्धत...

स्थापित केलेल्या मूर्तीमध्ये नुकत्याच जन्मलेल्या श्रीकृष्णाला माता देवकी स्तनपान घालत आहे आणि माता लक्ष्मी त्यांच्या चरणांना स्पर्श करत आहे, असा भाव प्रकट होईल, याची कल्पना करावी. त्यानंतर योग्य वेळी भगवान श्रीकृष्णाचे प्राकट्य झाले आहे, अशी भावना मनात ठेवून पूजा करावी. वैदिक पद्धतीने, पौराणिक पद्धतीने किंवा आपल्या संप्रदायाच्या परंपरेनुसार पंचोपचार, दशोपचार, षोडशोपचार अथवा आवरणपूजा यापैकी शक्य असेल त्या पद्धतीने श्रद्धेने पूजा करावी. पूजेमध्ये देवकी, वसुदेव, वासुदेव, बलराम, नंद, यशोदा आणि लक्ष्मी यांचा क्रमाने उल्लेख करावा. यानंतर देवकी मातेला पुढील मंत्राने अर्घ्य अर्पण करावे : ‘प्रण मे देवजननी त्वया जातस्तु वामनः, वसुदेवात तथा कृष्णो नमस्तुभ्यं नमो नमः। सपुत्रार्घ्यं प्रदत्तं मे गृहाणेमं नमोऽस्तु ते।’ त्यानंतर भगवान श्रीकृष्णाला ‘धर्माय धर्मेश्वराय धर्मपतये धर्मसम्भवाय गोविन्दाय नमो नमः।’ या मंत्राने पुष्पांजली अर्पण करावी. यानंतर जातकर्म, नाळच्छेदन, षष्ठीपूजन आणि नामकरण आदी विधी करावेत. त्यानंतर ‘सोमाय सोमेश्वराय सोमपतये सोमसम्भवाय सोमाय नमो नमः।’ या मंत्राने चंद्रदेवाची पूजा करावी.



## जन्माष्टमीच्या रात्री झोपणे अन् फलाहार करण्याचे काय नियम?

**भगवान श्रीकृष्णाचा जन्म मध्यरात्री झाला होता. त्यामुळे रात्री १२ वाजता भगवान श्रीकृष्णाची पूजा करण्याची परंपरा आहे. कृष्ण जन्माष्टमीला ‘मोहरात्र’ असेही म्हटले जाते. या दिवशी रात्री झोपणे तसेच व्रतादरम्यान फलाहार करण्याबाबत शास्त्रांमध्ये काही नियम सांगितले आहेत. अशी धार्मिक मान्यता आहे की, या दिवशी निर्जल उपवास करून रात्री जागरण तसेच भगवान श्रीकृष्णाची पूजा केल्याने विशेष कृपा प्राप्त होते.**

भगवान श्रीकृष्णाचा जन्म रोहिणी नक्षत्रात मध्यरात्री, म्हणजेच रात्री १२ वाजता झाला होता. भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला तेव्हा संपूर्ण सृष्टी निद्रावस्थेत होती. त्या वेळी त्यांचे माता-पिता देवकी आणि वसुदेव तसेच गोकुळात नंदबाबा जागे होते, अशी पौराणिक मान्यता आहे. त्यामुळे त्यांना भगवान श्रीकृष्णाची विशेष कृपा प्राप्त झाली. म्हणूनच जन्माष्टमीच्या रात्री झोपण्याऐवजी जागरण केल्याने अक्षय पुण्य प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे.



- जन्माष्टमीच्या रात्री जागरण का करावे? : पौराणिक मान्यतेनुसार कृष्ण जन्माष्टमी, शिवरात्र, दीपावली आणि महाअष्टमी या रात्रींना ‘महानिशा’ असे म्हटले जाते. या काळात दैवी ऊर्जा जागृत असते, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे या रात्री झोपणे टाळावे, असे सांगितले जाते. या रात्री योगेश्वर भगवान श्रीकृष्णाचे ध्यान आणि त्यांच्या नामस्मरणात वेळ घालवल्याने भक्त मोह-मायेपासून दूर होतो, अशी धार्मिक मान्यता आहे. तसेच या दिवशी व्रत केल्याने अनेक व्रतांइतके पुण्य प्राप्त होते, असे मानले जाते.
- मध्यरात्री श्रीकृष्णाची पूजा का केली जाते? : जन्माष्टमीची रात्र अत्यंत शुभ मानली जाते. भगवान श्रीकृष्णाचे प्राकट्य मध्यरात्री झाले होते. त्यामुळे भगवान श्रीकृष्णाच्या पूजेसाठी हा काळ सर्वोत्तम मानला जातो. या वेळी बालस्वरूपातील श्रीकृष्णाचा अभिषेक, श्रृंगार आणि पूजा केली जाते. पूजेपूर्वी बालगोपालांना पंचामृताने स्नान घातले जाते. त्यानंतर त्यांना नवीन वस्त्रे परिधान करून त्यांचा श्रृंगार केला जातो.

### फलाहार करण्याचे नियम

- जन्माष्टमीच्या दिवशी शक्य असल्यास निर्जल व्रत करावे आणि भगवान श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवानंतरच प्रसाद ग्रहण करून व्रत सोडावे.
- वृद्ध व्यक्ती आणि आजारी व्यक्तींनी आरोग्याचा विचार करून दिवसभरात एकदा फलाहार करू शकतात. उपवास करताना आपल्या प्रकृतीचा विचार करणे महत्त्वाचे आहे.
- जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रह्ममुहूर्तावर उठून स्नान करावे आणि भगवान श्रीकृष्णाची पूजा करावी. त्यानंतर व्रताचे पारण करावे. पारण केल्यानंतर त्या दिवशी सात्त्विक आहार घ्यावा.





### जन्माष्टमी व्रताची तयारी कशी करावी?

जन्माष्टमीचे व्रत करणाऱ्या व्यक्तीने व्रताच्या आदल्या दिवशी हलका, सात्त्विक आणि सहज पचणारा आहार घ्यावा. रात्री संयमाचे पालन करावे. व्रताच्या दिवशी सकाळी स्नान करून नित्यकर्मे आटोपावीत. त्यानंतर सूर्य, सोम, यम, काल, संधि, भूत, पवन, दिक्पाल, पृथ्वी, आकाश, खेचर, अमर आणि ब्रह्म आदी देवतांना नमस्कार करून पूर्व किंवा उत्तर दिशेकडे तोंड करून बसावे. हातात पाणी, फळ, कुश, फुले आणि गंध घेऊन ‘ममाखिलपाप प्रशमनपूर्वक सर्वाभीष्टसिद्धये श्रीकृष्ण जन्माष्टमी- व्रतमहं करिष्ये’ हा संकल्प करावा. त्यानंतर दुपारच्या सुमारास काळ्या तिळांच्या पाण्याने स्नान करून माता देवकीसाठी ‘सूतिका गृह’ निश्चित करावे. ते स्थान स्वच्छ आणि सुशोभित करून प्रसूतीगृहासाठी आवश्यक मानल्या जाणाऱ्या वस्तू योग्य पद्धतीने ठेवाव्यात. शक्य असल्यास भजन, कीर्तन किंवा वाद्यांचा कार्यक्रमही आयोजित करावा. प्रसूतीगृहातील सुखद आणि योग्य ठिकाणी सुंदर, मऊ अंथरुण असलेला मजबूत मंच तयार करावा. त्यावर अक्षतादींचे मंडल काढून शुभ कलशाची स्थापना करावी. त्यानंतर त्या ठिकाणी सोने, चांदी, तांबे, पितळ, रत्न, लाकूड, माती किंवा चित्ररूपातील श्रीकृष्णाची मूर्ती स्थापित करावी.

### चंद्रदेवाला अर्घ्य देण्याची पद्धत

शंखामध्ये पाणी, फळ, कुश, फुले आणि गंध ठेवावे. दोन्ही गुडघे जमिनीवर टेकवून पुढील मंत्राचा उच्चार करत चंद्रदेवाला अर्घ्य अर्पण करावे : ‘क्षीरोदार्णवसंभूत अत्रिनेत्रसमुद्भव, गृहाणार्घ्यं शशांकेमं रोहिण्या सहितो मम। ज्योत्स्नापते नमस्तुभ्य नमस्ते ज्योतिषां पते, नमस्ते रोहिणीकान्त अर्घ्य मे प्रतिगृह्यताम्।’ यानंतर रात्रीचा उर्वरित वेळ स्तोत्रपठण, भजन, कीर्तन आणि भगवान श्रीकृष्णाच्या नामस्मरणात घालवावा.

### व्रताचे पारण कधी करावे?

जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा स्नान करून पूजा करावी. ज्या तिथी, नक्षत्र किंवा अन्य योगानुसार व्रत केले असेल, तो योग संपल्यानंतर व्रताचे पारण करावे. मात्र, संबंधित तिथी किंवा नक्षत्र संपण्यास विलंब होत असल्यास पाणी प्राशन करून पारणाची पूर्तता करता येते. व्रताच्या संपूर्ण कालावधीत श्रद्धा, संयम आणि सात्त्विक भाव ठेवणे महत्त्वाचे मानले जाते.

## श्रीकृष्णाला अर्पण करा हे 8 पदार्थ...

**भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला जन्माष्टमी साजरी केली जाते. पौराणिक मान्यतेनुसार, जन्माष्टमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाला अष्टभोग अर्पण केल्याने बालगोपाल प्रसन्न होतात. त्यामुळे या दिवशी श्रीकृष्णाला कोणते पदार्थ नैवेद्य म्हणून अर्पण करावेत, हे जाणून घेऊया...**

### अर्पण करा हे 8 पदार्थ...

- माखन-मिश्री : गोकुळातील रहिवाशांना एक स्वप्न पडले होते की, माता यशोदेला पुत्ररत्न झाले असून तो माखन मागत आहे. त्यामुळे सर्वजण माता यशोदेला शुभेच्छा देण्यासाठी माखन घेऊन पोहोचले होते. भगवान श्रीकृष्ण मोठे झाल्यानंतर गोपींच्या घरातून माखन चोरून खात असत, अशीही पौराणिक कथा आहे. त्यामुळे जन्माष्टमीच्या दिवशी श्रीकृष्णाला माखन- मिश्रीचा नैवेद्य अर्पण करणे अत्यंत शुभ मानले जाते. हा भोग अर्पण केल्याने नातेसंबंधांमध्ये गोडवा टिकून राहतो आणि जीवनात सुख-समृद्धी येते, अशी श्रद्धा आहे.
- तुळशीदल : जन्माष्टमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाला नैवेद्य अर्पण करताना त्यामध्ये तुळशीदल म्हणजेच तुळशीचे पान अवश्य ठेवावे. धार्मिक मान्यतेनुसार, भगवान श्रीकृष्णाला अर्पण केलेल्या नैवेद्यामध्ये तुळशीदल असल्यास ते विशेष प्रिय मानले जाते. भगवान विष्णूंनी तुळशीला वरदान दिले होते की, तुळशीचा समावेश नसलेला नैवेद्य ते स्वीकारणार नाहीत, अशी पौराणिक मान्यता आहे. त्यामुळे भगवान विष्णूंच्या अवतारांना अर्पण केल्या जाणाऱ्या नैवेद्यामध्ये तुळशीचा समावेश करण्याची परंपरा आहे.
- धनियाची पंजीरी : जन्माष्टमीचा नैवेद्य धनियाच्या पंजीरीशिवाय अपूर्ण मानला जातो. त्यामुळे या दिवशी भगवान श्रीकृष्णाला धनियाच्या पंजीरीचा भोग अवश्य अर्पण करावा. ही पंजीरी शुद्ध तूप आणि धणे यांचा वापर करून तयार केली जाते. धनियाची पंजीरी भगवान श्रीकृष्णाला अत्यंत प्रिय असल्याची धार्मिक मान्यता आहे.
- पंचामृत : जन्माष्टमीच्या शुभ प्रसंगी भगवान श्रीकृष्णाला पंचामृताचा नैवेद्य अवश्य अर्पण करावा. पंचामृत तयार करताना विशेषतः कच्चे दूध, दही, तूप, मध आणि गंगाजल यांचा समावेश केला जातो. पंचामृत तयार करून ते भगवान श्रीकृष्णाला अर्पण करावे आणि त्यानंतर कुटुंबातील सर्व सदस्यांना प्रसाद म्हणून द्यावे.
- खीर : जन्माष्टमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्णासाठी मखाण्याची किंवा तांदळाची खीर तयार करावी. श्रीकृष्णाला खिरीचा नैवेद्य विशेष प्रिय असल्याची मान्यता आहे. आपल्या आवडीनुसार मखाण्याची खीर किंवा तांदळाची खीर तयार करून ती भगवान श्रीकृष्णाला अर्पण करता येते.
- पंचमेवा : भगवान श्रीकृष्णाच्या प्रसादामध्ये पंचमेव्याचा समावेश करावा. पंचमेवा तयार करताना मनुका, छुहारा, मखाणा, काजू आणि बदाम यांचा समावेश करावा.
- ताजी हंगामी फळे : बालगोपालाला ताजी हंगामी फळे नैवेद्य म्हणून अर्पण करावीत. नाशपती, सफरचंद, मोसंबी यांसारख्या फळांचा यामध्ये समावेश करता येतो. यासोबतच काकडीचाही विशेषतः समावेश करावा, अशी धार्मिक परंपरा आहे.

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# मराठा आरक्षण : जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ जिल्हा बंदला संमिश्र प्रतिसाद













**लोहा (प्रतिनिधी)** – मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील हे आंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या उपोषणाला पाठिंबा देत सकल मराठा समाजाच्या वतीने दि. ३ सप्टेंबरची लोहा शहर व तालुका बंदची हाक देण्यात आली होती. त्याप्रमाणे त्या हाकेला ओ देत शहरातील सर्व व्यापारी बाधवांनी कडकडीत बंद पाळून सकल मराठा समाजाच्या बंदला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शविला.

गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात मराठा सेवकांनी सरकारच्या मराठा विरोधी धोरणांचा धिक्कार करत मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शवत शहरातील व्यापारी बांधवांना बंद संदर्भात सुचना करत सदरील बंद यशस्वी करण्यासाठीचे आवाहन केले. तत्पूर्वीच व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला.या बंदमुळे नेहमी गर्दीने भरलेल्या रस्त्यावर शुकशुकाट जाणवत होता. लोहा बसस्थानकात नेहमीची होणारी गर्दी आज दिसून आली नाही. अत्यावश्यक सेवा वगळता शाळा, महाविद्यालये, खासगी आस्थापने, प्रतिष्ठाने यांनी बंद पाळून सहकार्य केले.

लोहा शहर परिसरासह तालुक्यातील सोनखेड, मारतळा, कापसी आदी ठिकाणी व्यापारी बांधवांनी बंद पाळला. सकल मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवाली सराटी येथे बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणास लोहा शहर व तालुका बंद करून समर्थन देत बंदला कुठेही गालबोट न लावता यशस्वीरित्या बंद पार पडला. यावेळी लोहा पोलीस ठाण्याकडून भाजी मंडई, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बसस्थानक आदी महत्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. हा बंद शांततेत पार पडला.

**मारतळा येथे कडकडीत बंद**

मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळावा, तसेच यापूर्वी देण्यात आलेल्या कुणबी प्रमाणपत्रांची वैधता निश्चित करण्याच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गुरुवार दि. ३ सप्टेंबर रोजी मारतळा येथील अत्यावश्यक सेवा (त्यात मेडिकल व दवाखाने) वगळून बाजारपेठ बंद ठेवून कडकडीत बंद पाळण्यात आला.

मारतळा (ता.लोहा) येथील सकल मराठा समाजाच्या वतीने बंदचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला व्यापारी, दुकानदार तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपली दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवली. त्यामुळे नेहमी गजबजलेल्या बाजारपेठेत गुरुवारी शुकशुकाट दिसून आला. मराठा समाजाच्या आरक्षण मागणीला पाठिंबा दर्शविण्यासाठी शंभर टक्के बंद पाळण्यात आल्याने आंदोलनाला स्थानिक पातळीवर मोठा प्रतिसाद मिळाला.

यावेळी उमरा सर्कलमधील सकल मराठा समाजाच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून शांततेत आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. दरम्यान अनुचित प्रकार घडू नये म्हणून उस्माननगर पोलिसांनी बंदोबस्त ठेवला होता.

**मराठा समाजाच्या मागण्यांसाठी हदगाव शहरात कडकडीत बंद**

**हदगाव (प्रतिनिधी)** –मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी संघर्षयोद्धा मनोज पाटील जरांगे यांच्या नेतृत्वाखाली अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणास पाठिंबा देण्यासाठी हदगाव शहरातील बाजारपेठ गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी कडकडीत बंद ठेवण्यात आली. सकल मराठा समाज, हदगाव तालुक्याच्या वतीने बंदबाबत तहसीलदार तसेच हदगाव पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले.

मराठा समाजाच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी हदगाव तालुक्यातील मराठा समाजाचे दत्ता पाटील हडसणीकर, लक्ष्मण पाटील रुईकर व ओमप्रकाश पाटील कदम हे देखील उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या उपोषणाला तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला समर्थन म्हणून हदगाव शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते.

दरम्यान, गुरुवारी सकाळी मराठा कार्यकर्त्यांनी शहरातून रॅली काढून व्यापाऱ्यांना आपापली प्रतिष्ठाने बंद ठेवण्याचे आवाहन केले. या आवाहनाला व्यापारी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शहरातील प्रमुख बाजारपेठेतील दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने दिवसभर बंद ठेवण्यात आल्याने संपूर्ण बाजारपेठेत शुकशुकाट दिसून आला. काही काळ शहरातील वाहतूकही बंद ठेवण्यात आली होती. मराठा समाजाच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी आंदोलक व सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली.

**माळाकोळी येथे रास्ता रोको**

लोहा तालुक्यातील माळाकोळी येथे राष्ट्रीय महामार्गावर माळाकोळी सर्कलच्या सकल मराठा बांधवांच्या वतीने मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ नांदेड-लातूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

बराच वेळ चाललेल्या रास्तारोकोमुळे मोठ्या प्रमाणात वाहने ठप्प झाली होती. गेली अनेक अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी सकल मराठा बांधवांच्या वतीने या आंदोलनाचं आयोजन करण्यात आलं होतं. या रास्ता रोको आंदोलना दरम्यान सरकारबद्दल असलेली नाराजी व्यक्त करत सरकारचा निषेध व्यक्त केला.

या प्रसंगी मोठ्या प्रमाणात मराठा बांधवांसह इत्तरही समाज बांधवांनी या आंदोलनात आपला सहभाग नोंदवला आणि बराच वेळ चाललेल्या रास्तारोकोमुळे वाहनांची कोंडी झाल्यामुळे पोलिसांच्या मध्यस्थीने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. हे आंदोलन शांततेत पार पडले आहे.



**मुखेड** – मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने मुखेड शहर शांततेत बंद करून मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा देण्यात आला. यावेळी पोलीस प्रशासनाच्यावतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. **(छायाचित्रकार-गणेश आंबेकर)**

# मराठा आंदोलनाचा नांदेडमध्ये एल्गार



**नांदेड (प्रतिनिधी)** – मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे सुरू केलेल्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ नांदेड जिल्ह्यात सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या जिल्हा बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरासह जिल्ह्यातील विविध भागांमध्ये व्यापारी, नागरिक व समाजबांधवांनी बंदमध्ये सहभागी होत आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

मनोज जरांगे पाटील हे गेल्या सहा दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या मागण्यांसाठी आमरण उपोषण करीत आहेत. मात्र, त्यांच्या आंदोलनाकडे तसेच खालावत चाललेल्या प्रकृतीकडे शासनाकडून अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचा आरोप करत सकल मराठा समाजाच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील मराठा बांधव आक्रमकपणे रस्त्यावर उतरले आणि जिल्हा बंद आंदोलन यशस्वी केले.

बंदच्या आवाहनाला शहरातील व्यापारी वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपापली दुकाने व प्रतिष्ठाने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दिला. काही भागांमध्ये शाळा व कोचिंग क्लासेसनाही सुट्टी जाहीर करण्यात आल्याने बंदला व्यापक प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले.

यावेळी सकल मराठा समाजाच्या वतीने शहरातील राज कॉर्नर येथून मोटारसायकल रॅली काढण्यात आली. रॅलीत मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते. विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री महोदयांना मराठा समाजाच्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. नांदेड शहरासह नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर, हदगाव, लोहा, कंधार, मुदखेड यांसह इतर तालुक्यातही मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ तालुका बंद करून तहसीलदार महोदय यांना सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले.

मराठा समाजाच्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.


पान १ वरून..


**गावठी पिस्तूल...**

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि साईनाथ पुयड, अंमलदार संतोष बेल्लुरोड, इम्रान शेख, बालाजी कदम, प्रमोद जोंधळे, संदीप घोगरे, रविकुमार हराळे, अमोल घेवारे यांनी पार पाडली.

-----------

**महाप्रसाद, लंगर,...**

आयात अन्नपदार्थ, बेकरी आणि पॅकबंद पाणी या सर्वांवर एफडीएची कडक नजर असेल. 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवले जात असून, सण-उत्सवांमध्ये कोणतीही अप्रिय घटना घडू नये हा यामागील मुख्य उद्देश आहे. सण संपल्यानंतर १४ दिवसांच्या आत आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दोषींवर न्यायालयात खटले दाखल केले जातील. इथून पुढे प्रत्येक सणासाठी वेगळा आदेश काढण्याची गरज उरणार नसून, हा स्थायी आदेश पूर्ण वर्षासाठी लागू राहील.

# कृषी विभागाच्या आकृतीबंधाविरोधात एल्गार; आजपासून राज्यभर 'लेखणी बंद'



**नांदेड (प्रतिनिधी)**– शासनाने तयार केलेल्या अपारदर्शक व अतांत्रिक प्रस्तावित आकृतीबंधाविरोधात महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या आकृतीबंधामुळे शेतकरी, कृषी विद्यार्थी व तांत्रिक अधिकारी-कर्मचाऱ्यांचे हित धोक्यात येत असल्याचा आरोप करत महासंघाने ३ सप्टेंबर २०२६ पासून टप्प्याटप्प्याने कामबंद आंदोलन पुकारले आहे.

आज राज्यव्यापी 'लेखणी बंद' आंदोलन करण्यात येणार असून, त्यामुळे कृषी विभागाचे सर्व अहवाल संकलन व प्रशासकीय कामकाज ठप्प होण्याची शक्यता आहे. महासंघाने यापूर्वी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व कृषी मंत्र्यांना निवेदने दिली होती. तसेच २८ ऑगस्ट रोजी कृषी आयुक्त आणि ३१ ऑगस्ट रोजी सचिव, कृषी यांच्यासोबत बैठकीत बाजू मांडली होती. मात्र प्रशासनाने दखल न घेतल्याने हे आंदोलन हाती घेतल्याचे महासंघाने म्हटले आहे. दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी सामूहिक रजा घेऊन कृषी आयुक्तालय, पुणे येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या संदर्भातील निवेदन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड यांच्यामार्फत मुख्यमंत्री व कृषी मंत्र्यांना देण्यात आले.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष दत्तकुमार कळसाईत, तंत्र अधिकारी राजेश मिरगेवार, संदीप स्वामी, तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल, जिल्हा गुणनियंत्रण अधिकारी अमोल पेकम, कृषी अधिकारी माधव चामे, उप कृषी अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजयानंद भोसले, नितीन नाईक, विनोद देशमुख, सहायक कृषी अधिकारी संघटनेचे राज्य कोषाध्यक्ष वसंत जारीकोटे, जिल्हाध्यक्ष शंकर पवार, कोषाध्यक्ष गजानन पांडागळे, राजू पिल्लेवार, शिवकुमार पाटील, दत्तात्रय चिंतावार, दत्ता भुते, विजयकुमार पाटील, प्रल्हाद येवते यांच्यासह सर्व तांत्रिक संवर्गाचे अधिकारी- कर्मचारी सहभागी झाले होते.


पान १ वरून...


**चार प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय...**

त्यांच्या मागण्यांवर राज्य सरकारच्या मंत्र्यांच्या गटाने विचार केला आणि ते मनोज जरांगेंच्या भेटीला आले. या मंत्र्यांच्या शिष्टमंडळामध्ये राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत आणि मकरंद पाटील यांचा समावेश आहे.

हैदराबाद गॅझेटनुसार ४ सप्टेंबरपासून मराठा समाजाने कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं. तसेच सातारा आणि कोल्हापूर गॅझेटचाही जीआर सरकारने काढावा अशी मागणी जरांगे यांनी मंत्र्यांकडे केली.

-------------

**सकल मराठा समाजाच्यावतीने...**

समाजाच्यावतीने होळी करून शासन विरोधी घोषणाबाजी करण्यात आली तर येळेगाव फाट्यावर टायर जाळून शासनाच्या विरुद्ध घोषणाबाजी करत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

मराठा समाजाला त्वरित आरक्षण मिळावे या मागणीसाठी पिंपळगाव म. नागपूर-नांदेड राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. आंदोलनामुळे २ ते ३ किलो मिटर रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. आरक्षण योध्दे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून सकल मराठा समाजाच्या वतीने सकल मराठा समाजाने पिंपळगाव म.,येळेगाव ता. अर्धापूर येथे रास्ता रोको आंदोलन करीत शासनाच्या विरुद्ध घोषणाबाजी केली. सकल मराठा समाजाचे आंदोलन शांततेत पार पडावे यासाठी पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# चांदोजी वैद्य यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**– हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील सुकळी वीर गावचे रहिवासी तथा शेतकरी चांदोजी गोविंदराव वैद्य (वय ८२ वर्ष) यांचे दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ वा. वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी शांताबाई, गोविंद व दामोदर ही दोन मुले, मुलगी रेणुका गोविंद बारसे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गावातील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आप्तेष्टांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# नगरसेवक वैभव खांडेकर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**– बिलोली येथील नगरपालिकेचे नगरसेवक वैभव खांडेकर यांचे गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवार दि. ४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता कुंडलवाडी येथील त्यांच्या निवासस्थानावरून निघणार आहे. त्यांच्या पार्थिवावर कुंडलवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांनी कळविले आहे. नांदेडचे प्रथम महापौर सुधाकर पांढरे यांचे ते जावई होत.





**नांदेड**– ऑल टेन्ट डिलर्स वेल्फेअर ऑर्गनायझेशन महाराष्ट्र संलग्न टेंट हाऊस मंगल कार्यालय केटर्स अँड डेकोरेटर्स ओनर्स वेल्फेअर असोसिएशनच्यावतीने ओम गार्डन येथे वार्षिक सभा व स्नेहमिलन सोहळा पार पडला. यावेळी आ. अमरनाथ राजूरकर, दडू शेठ पुरोहित, सागरभाई चव्हाण, गोविंद शुक्ला, विजयसिंह परदेशी, आशिष नेरलकर, सुनील माळी, सचिन शिंदे, भागवत टेन्ट हाऊस मंगल कार्यालय केटर्स डेकोरेटर्स ओनर्स वेल्फेअर असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

**छाया-करणसिंह बैस, नांदेड**


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com